# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

*December 2021 / January 2022 / Issue. No.1*




GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
MACCIA™ 100
Apex Chamber of the State
1927-2027

# Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture
# Newly Elected Office Bearers (2021-2024)



**Lalit Gandhi**
President



**Umesh Dashrathi**
Senior Vice President



**Karunakar Shetty**
Vice President
Mumbai -1



**Shubhangi Tirodkar**
Vice President
Mumbai - 2



**Sudhakar Deshmukh**
Vice President
North Maharashtra



**Ravindra Mangave**
Vice President
Western Maharashtra



**Chandrashekhar Punalekar**
Vice President
Konkan

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

December 2021 / January 2022 / I No. 1

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई– ४०० ००१
फोन: (०२२) २२८५५८५९/६०
ई–मेल: maccia@maccia.org.in
वेबसाईट: www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **श्री. ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **श्री. उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **श्री. करूणाकर शेट्टी**
  **सौ. शुभांगी तिरोडकर**
  **श्री. रविंद्र माणगावे**
  **श्री. सुधाकर देशमुख**
  **श्री. चंद्रशेखर पुनाळेकर**
- प्रभारी सरकार्यवाह
  **श्री. सागर नागरे**
- संपादक
  **कु. विनी दत्ता**
- सहसंपादक
  **श्री. अविनाश पाठक**

- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक – १.
  फोन: (०२५३)२५७७७०४ / ई–मेल: nsk@maccia.org.in
- ११३२/२, अलंकार भवन, दुसरा मजला, फर्ग्युसल कॉलेज रोड, पुणे – ४११ ०१६, ई–मेल : western@maccia.org.in

**Note:** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१) मनोगत
२) नवनिर्वाचित गव्हर्निंग काउन्सिल सदस्य
३) Analysis of Important Changes in GST...
४) Start These Most Profitable Business..
५) घे भरारी... Be A Game Changer..
६) नवीन व्यवसाय सुरू करत आहात...
७) व्यापाऱ्यांसाठी निवृत्तीवेतनाची गरज...
८) चेंबर वृत्त
९) पदाधिकारी परिचय



# मनोगत...

**ललित गांधी**
**अध्यक्ष**

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

सर्वप्रथम आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र चेंबरच्या निवडणूकीत आपण मला अध्यक्षपदी बिनविरोध निवडून दिले व ४० वा अध्यक्ष होण्याचा मान दिला, तसेच सर्व व्यवस्थापन समिती व कार्यकारीणी समिती सदस्यांच्या निवडणूकाही बिनविरोध झाल्याबद्दल आपल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

भारतीय लोकांना उद्योग व व्यापारात पुढे आणण्यासाठी अथक प्रयत्न करणारे द्रष्टे उद्योजक शेठवालचंद हिराचंद यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र चेंबरला ९५ वर्षांचा गौरवपुर्ण इतिहास आहे. महाराष्ट्रातील छोट्यात छोट्या व्यापारी-उद्योजक व्यावसायिकां पासून मोठ्यात मोठ्या लोकांसाठी स्वत:चे व हक्काचे व्यासपीठ म्हणजे महाराष्ट्र चेंबर, किंबहुना छोट्यात छोट्या व्यापारी उद्योजकांना व्यापार उद्योगाच्या नवनवीन संधी देणे व त्यांना प्रगतीपथावर नेणे हेच महाराष्ट्र चेंबरचे मुख्य कार्य. अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर महाराष्ट्र चेंबरच्या प्रत्येक सभासदाचा उत्कर्ष होईल, चेंबरमुळे प्रत्येकाचा व्यवसाय वाढण्यास मदत होईल या उद्देशाने कार्य करण्याचा संकल्प आम्ही सर्वांनी केला आहे. तसेच राज्यातील व्यापार उद्योगांच्या अडचणी सोडविणे व व्यापार उद्योग वाढण्यास चालना देण्याच्या कामास चेंबरच्या माध्यमातून सुरू केले आहे.

**२०२७ मध्ये 'महाराष्ट्र चेंबर' ला १०० वर्षे पुर्ण होत आहेत.**

**चेंबरच्या शताब्दि वर्षापर्यंत महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनविणे या उद्देशाने कार्यरत राहण्याचा संकल्प केला असुन त्यादृष्टीने नियोजन व कार्यवाही सुरू केली आहे.**

महाराष्ट्र चेंबरच्या प्रत्येक सभासदास त्याच्या व्यापार-उद्योग व्यवसायामध्ये चेंबरमुळे वृध्दि झाली पाहीजे, चेंबर च्या माध्यमातुन प्रत्येक सभासदास व्यवसायामध्ये नवीन संधी मिळाल्या पाहीजेत या दृष्टीने या कार्यकाळात प्रामुख्याने कार्य केले जाणार आहे.

महाराष्ट्रातील मॅन्युफॅक्चरींग इंडस्ट्रीसाठी क्लस्टर आधारीत विकासासाठी सहाय्य, कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगाला सहकार्यासाठी क्लस्टर आधारीत उपक्रम, महिला उद्योजिकांसाठी क्लस्टर आधारीत उपक्रम अशा विविध स्तरावरील आयोजनांद्वारे संपुर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात 'महाराष्ट्र चेंबर' च्या माध्यमातुन किमान एक उपक्रम २०२७ पर्यंत सुरू करण्याचा दृढ संकल्प आम्ही केला आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र चेंबर तर्फे महाराष्ट्रासाठी महिला उद्योजकता धोरण जाहीर केले आहे. कोअर समितीच्या मार्गदर्शनाखाली महिला उद्योजकता धोरणाची अंमल बजावणी करण्यात येणार असून २०२२ मध्ये नाशिकमधील महिला उद्योजकता क्लस्टरच्या उद्घाटनापासून अंमल बजावणीची सुरवात केली जाईल.

त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र चेंबर तर्फे महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाईल. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजिकांसाठी असलेल्या व्यवसायाच्या संधी, राज्य व केंद्र सरकारच्या योजना याविषयी माहिती देण्यासाठी मार्गदर्शन केंद्र येत्या दोन वर्षात सुरू करण्यात येतील. महिलांना त्यांच्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी सर्व

सुविधा युक्त जागा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र महिला उत्पादन क्लस्टर्सची उभारणी केली जाईल. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी संपूर्ण राज्यात विक्री व प्रदर्शन केंद्र उभारली जातील. विविध बँकांबरोबर सहकार्य करार करून महिलांसाठी प्रकल्प उभारणी कर्ज सवलतीच्या व्याजदरात उपलब्ध करून दिले जाईल. महिला उत्पादन क्लस्टर्स, विक्री व प्रदर्शन केंद्राच्या निर्मितीचा कालबध्द कार्यक्रम निश्चित केला असून २०२२ मध्ये नाशिक, नागपूर, लातूर, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व २०२३ मध्ये जळगाव, कोल्हापूर, सोलापूर, गडचिरोली, अकोला, जालना या जिल्ह्यात केंद्रांचा प्रारंभ करण्यात येईल. उर्वरीत जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने २०२७ या महाराष्ट्र चेंबरच्या शताब्दीवर्षापर्यंत ही योजनापूर्ण करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र चेंबरच्या अंतर्गत राज्यस्तरीय महिला विभागाबरोबरच चेंबरच्या सहा विभागात विभागीय महिला समिती कार्यान्वित केल्या जातील.

केंद्रियमंत्री नामदार पियुष यांची भेट घेऊन त्यांना वस्त्रोद्योगा समोरील विविध समस्या समजावून सांगितले तसेच विशेषता: वस्त्रोद्योगातील प्रस्तावित जीएसटी दरवाढीमुळे या उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता असूनही दरवाढ रद्द करणे आवश्यक असल्याचे सांगतले. त्यास त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रिय वस्त्रोद्योग मंत्रालया तर्फे जीएसटी कौन्सिलकडे पाठपुरावा करून दरवाढ रद्द करून घेण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन चेंबरला दिले हे आश्वासन त्यांनी पुर्ण केले व दरवाढीला स्थगिती मिळवून दिली हे चेंबरला मिळालेले महत्वपूर्ण यश आहे.

केंद्रिय परिवहन मंत्री नाम. नितिन गडकरी, केंद्रिय एमएसएमइ मंत्री नारायण राणे, केंद्रिय वित्तराज्यमंत्री भागवत कराड यांची भेट घेऊन राज्यातील व्यापार उद्योगांच्या अडचणी व विकासाच्या दृष्टीने चर्चा केली. चर्चे प्रसंगी उद्योगमंत्री नारायण राणे व वित्तराज्यमंत्री भागवत कराड यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती घेऊन राज्यातील व्यापार उद्योजकांच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

केंद्रिय शिपिंग, पोर्ट डेव्हलपमेंट, जलवाहतूक व आयुष विभागाचे कॅबिनेट मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची मुंबईत भेट घेऊन त्यांना महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. आयात निर्याती बाबत चर्चा केली. याप्रसंगी मंत्री सोनोवाल यांनी शिपिंग, पोर्ट व जलवाहतूक या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरला भेट देण्याचे मान्य केले.

महाराष्ट्राचे पर्यटन पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री नामदार आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन राज्याच्या पर्यटन विकासासाठी प्रस्ताव सादर केला असता त्यांनी चेंबरने दिलेल्या पर्यटन विकासाच्या प्रस्तावावर प्राधान्याने विचार करून व लवकरच चेंबरच्या पदाधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

करोनाचे निर्बंध शिथिल करण्यात आले असलेतरी नविन ओमायक्रॉनचा भारतात व महाराष्ट्र शिरकाव झाल्यामुळे राज्य सरकारने पुन्हा नव्याने काही निर्बंध लागू केले आहे. त्यामध्ये व्यापारी उद्योगांना अडचणीचा असणारा प्रमुख नियम म्हणून तुमच्या दुकानात, आस्थापनेत येणाऱ्या ग्राहकांचे लसीकरण झालेले असावे ग्राहकाने लसीकरण केलेले नसल्यास ग्राहकांना ५०० रूपये दंड व व्यापाऱ्यास १०००० रूपये दंड करण्याचा आहे. या अन्यायकारक नियमास महाराष्ट्र चेंबर तर्फे विरोध करण्याचे ठरविले व त्यानुसार मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांना निवेदनही दिले. नाशिक, ठाणे, सांगली जळगाव, जिंतूर तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील चेंबरच्या पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्यांनी स्थानिक पातळीवर पालकमंत्री, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, तहसिलदार यांच्या भेटी घेऊन निवेदन देऊन विरोध दर्शविला.

विविधस्तरावर कार्य सुरू झाले आहे नवीन व्यवस्थापन व कार्यकारीणी समितीत अतिशय तज्ञ सदस्य निवडून आले असून निश्चितच त्यांचा फायदा महाराष्ट्र चेंबर व व्यापार उद्योगांना होईल. राज्यातील व्यापार-उद्योगांचा व महाराष्ट्र चेंबरच्या सदस्यांच्या व्यापार-उद्योगांचा विकासाच्या योजना राबविण्यात आगामी काळात निश्चितच यश मिळेल.

धन्यवाद !

**ललित गांधी**

**अध्यक्ष**

## Newly Governing Council Members

### Kolhapur


Mr. Prakash K. Awade (MLA)


Mr. Uday T. Lokhande


Mr. Ramakant N. Malu


Mr. Satish J. Mane


Mr. Dhananjay S. Dugge


Mr. Sanjay K. Patil

### Jalna


Mr. Ghanshyam C. Goyal


Mr. Dwarkaprasad Soni

### Parbhani


Mr. Brijgopal R. Toshniwal


Mr. Vijay O. Daga

### Akola


Mr. Sanjay M. Sharma


CA Kushal Sabadra

### Raigad


Mr. Pravin T. Gharat


Mr. Vilas M. Kothari
Raigad

### Sindhudurg


Mr. Manoj S. Walawalkar


Mr. Ashok C. Sarang


Mr. Bhalchandra S. Raut


Mr. Mahesh B. Manjarekar

## Newly Governing Council Members

### Dhule


Mr. Pavan R. Agrawal


Mr. Nitin N. Bang


Mr. Arun G. Nawarkar

### Jalgaon


Mr. Sanjay M. Dadlika


Mrs. Sangeeta P. Patil


Mr. Nitin V. Ingale

### Pune


Mr. Vilas P. Jain


Mr. Dinesh Mehta


Prof. Dr. Sanjay B. Chordiya

### Sangli


Mr. Sanjay R. Aranake


Mr. Bhalchandra Patil


Mr. Swapnil Shah


Mr. Shrikrishna S. Gosavi

### Aurangabad


Mr. Ravindra R. Kondekar


Mr. Digambar S. Muley


Mr. Shivprasad Z. Jaju



Mr. Adeshpal Singh Chhabda

# Newly Governing Council Members

## Mumbai-1


Mr. Shrikrishna Parab


Mrs. Rekha V. Pagdhare


Mrs. Binda M. Kanayalkar


Mrs. Pradnya G. Ponkshe


Mr. Vikas V. Deodhar


Mr. Chandrakant Mokal


Mr. Bhadrakumar S. Bangdiwala


Mr. Keshav A. Korgaonkar


Mr. Prakash C. Kanugo


Mr. Ramesh F. Ranka


Mr. Prafulla P. Chhajed


Mr. Sanjay B. Shah


Mr. Chetan A. Kulkarni


Mrs. Dhanashri M. Hardas


Mr. Uttam B. Shah


Mr. Viraj R. Chodankar


Mr. Pramod Shah


Mr. Jitendra N. Shah


Mr. Anil V. Tolia


Ms. Mansi Manjarekar

## Mumbai- 2 (Thane)


Mrs. Sonali M. Gandre


Mrs. Gauri M. Kher


Mr. Manish D. Patil


Mr. Mahendra D. Jain

## Navi Mumbai


Mr. Krishna M. Thacker


Mr. Subhodh Mestry


Mr. Ganpat P. Korade


Mr. Nikhil S. Gurjar

## Newly Governing Council Members

### Nashik


Mr. Kailas Aher


Mr. Sanjay P. Mahajan


Mr. Venus B. Wani


Mr. Sanjay Rathi


Mr. Nemichand Kochar


Mr. Hemant Kankriya


Mr. Ravindra Zope


Mr. Hemant Gaikwad


Mr. Manish S. Rawal


Mr. Ravi K. Jain


Mr. Sachin S. Shah


Anju B. Singhal


Mr. Bhavesh M. Manek


Dr. Mithila Kapadnis


Mr. Swapnil B. Jain


Mr. Prashant Joshi


Mr. Rajaram N. Sangle


Mr. Sachin S. Jadhav


Mr. Milind B. Rajput


Mr. Dattatry S. Bhalerao


Mr. Rajesh M. Malpure

### Palghar


Ms. Grishma R. Patil

### Ahmednagar


Mr. Nilesh K. Chavan


Mr. Prakash V. Kalantri

# Analysis of Important Changes in GST effective from 01 January 2022






CA दिपेश गुंदेशा
मोबाईल नंबर : ९८३४२२०१२३

**1) Restrictions on availing ITC.**

◆ Input Tax Credit will be available only for those invoices which are visible in GSTR -2B.

- ◆ GSTR 2B is generated based on GSTR-1 filed by selling party till the due date of GSTR-1. So Input tax credit relating to invoices for which GSTR-1 is filed by selling the party after 11th/13th of next month will not be available in that month.
- ◆ This rule is made more strict by amending the GST act.
- ◆ Earlier limit of 5% is also not available now onwards.

**Henceforth, Input Tax Credit will be strictly taken based on GSTR 2B.**

**Please ensure that all your purchase parties file their GSTR –1, IFF before the due date.**

**2) Penalty for movement of goods without valid Invoice/ E-Way bill**

◆ Penalty for movement of goods without proper documents like Tax Invoice, Delivery Challan,E-Way bill, has been increased from 100% to 200% of tax.

◆ Also appeal against such orders can only be filed after paying 25% deposit of such penalty. (Earlier this pre-deposit was 10%)

◆ For example, Scenario

Goods of Rs.10.00 lakhs with 28% rate of GST are intercepted by the department without a valid document.

**Before 01/01/2022**

Rs.2.8 lakhs tax and Rs.2.8 lakhs penalty was required to be paid in order to release such goods.

Now. Rs.5.6 Lakhs penalty would be payable in order to release goods.

In case appeal was to be filed against such order, 10% of tax i.e. Rs.28,000/- was required to be paid as pre-deposit.

Now if appeal is required to be filed in such case, 25% of penalty i.e. Rs.1,40,000/- will be required to be paid as pre-deposit

**3) Difference between GSTR -3B & GSTR-1**

◆ If there is any difference between GSTR-1 and GSTR-3B filed for any period or if GSTR-1 is only filed without filing GSTR-3B, liability disclosed in GSTR-1 will be treated as self-assessed liability and direct recovery proceedings can be initiated in such cases.

◆ We need to be very careful while filling GSTR-1.

**4) Blocking GSTR-1 if GSTR-3B is not filed.**

◆ Facility to file GSTR-1 will be blocked if you have not submitted the return in FORM GSTR-3B for the preceding month.

◆ For example, if a taxpayer has not filed GSTR-3B for November 2021, the GSTR-1 filing facility will be blocked from the 1st January 2022 and GSTR-1 for December 21 cannot be filed.

**Author's Comments :**

This is a Welcome Change. in order to claim ITC, Not only reporting of Invoice in GSTR-1 is essential, but payment of actual tax by supplier is also necessary. This amendment will prevent non-compliant taxpayers who just file GSTR-1 without payment of taxes in GSTR-3B. However, the government should make the system of availing ITC more robust and efficient from th taxpayers point of view.

**5) Powers to attach Property or Bank account.**

◆ Now GST Department has been given wider powers to attach property and Bank accounts in case any proceedings have been initiated.

◆ Notably, attachment can be made even before demand is finalized and without opportunity to be heard is given,to protect the interest of the revenue.

**6) Other changes**

◆ GST rates for few items like footwear have been changed from 01st January 2022.

◆ In case of restaurants supplying through e-commerce operators like swiggy, zomato, the point of collection of tax has being changed. Earlier, the restaurants were liable to pay GST; now GST will have to be paid by the aggregators.

◆ Now Commissioner has been granted wide powers to call for information. Now information relating to any matter dealt with in connection with GST Act can be called for by Commissioner from anyone.

◆ In case of delay in payment of taxes, interest liability was required to be calculated by taxpayer and system was not calculating interest, unlike late fees which were auto-calculated by GSTIN system. Many taxpayers were not paying interest and the department had to issue notices to recover such interest. Now change has been made in system by GSTIN and interest will also be auto-calculated by system. Now taxpayer will have to pay interest instantly along with return.

◆ There are other procedural changes like delinking section 73/74 with section 129 and also section 129 is delinked with section 130. Thus conclusion of proceedingsunder one section will not automatically conclude proceedings under other section. These amendments may lead to multiplicity of litigations arising against the taxpayers out of the same cause of action.

**Concluding Remarks-**

Over the years, powers given to department are increased by introducing various amendments in GST law and same is the case with these set of amendments. Most of these amendments are targeted towards curbing tax evasions. However government needs to ensure that in process of curbing tax evasion, genuine and honest tax payers are not punished. Rigorous procedural safeguards must be put in place to ensure that the interest of compliant and honest taxpayer is not harmed. Trade associations should work closely with professionals to understand the intricacies of such amendments, its impact on businesses and make appropriate representations.

Also it our responsibility to join hands with Government to further promote taxpayer friendly measures which are in line with objective of GST viz. Seamless flow of credit and that of government viz. Ease of doing business.

# START THESE MOST PROFITABLE BUSINESS IDEAS IN 2022 WITH FULL GOVERNMENT SUPPORT & EARN IN LAKHS!



2021 had its own share of problems, the persistent covid 19 pandemic, lockdowns, etc. But with the proper distribution of vaccines, the things started chugging back to normal. New Year signifies a fresh start and is the best time for such things! In this article we have brought a list of Agribusiness ideas that you can start with full government support!

**Government Assistance to Start Small Businesses:**

Entrepreneurship is critical for the growth of a country. Entrepreneurs or Businessmen are generally viewed as national assets due to their forward-thinking innovation. Prime Minister Modi understands the importance of the Businessmen and that is why he has started various programs & schemes such as Pradhan Mantri MUDRA Yojana in addition to Programs like Start Up India & Make in India which promote entrepreneurship in the country.

**Pradhan Mantri MUDRA Yojana (PMMY)** is a scheme launched by the Prime Minister on April 8, 2015 for providing loans up to **10 lakh** to the non-corporate, nonfarm small/micro-enterprises. These loans are classified as MUDRA loans under PMMY. These loans are given by Commercial Banks, RRBs, Small Finance Banks, MFIs and NBFCs.

Krishi Jagran abides by PM's thinking and therefore, through our articles we constantly try to motivate the youth of the country to become Job givers instead of Job seekers by suggesting the most profitable & lucrative business Ideas.

**Farming of Vegetables**

Spinach, Potato, Onion, Tomato, Cauliflower, Cabbage, Bean, Egg Plants among others, are all vegetables that are enjoyed around the world and can also be grown anywhere. This demonstrates that there is a sizable vegetable market. So, if you're thinking about starting an agricultural crop cultivation firm, vegetable farming is one of your possibilities.

**Business of Fertilizer Distribution**

Entrepreneurs can start a fertiliser distribution business from anywhere if they have a good Collection of items. Firstly you will have to obtain a License to Sell Seed, Fertilizer, Vermi-Compost, etc.

Then, Find suppliers in your neighbourhood who are eager to do business at a reasonable price. Obtain high-quality products from a reputable source at a reasonable cost. When purchasing in bulk, you can also choose to import. The source you choose for fertiliser delivery will be determined by your start-up budget.

**Laboratory for Soil Analysis**

Soil testing is an agronomically sound, helpful, and environmentally conscious method for monitoring nutrient levels and making exact fertilizer recommendations for a variety of crops and cropping sequences while minimising environmental impact. One of the best agriculture business ideas is to open a soil testing lab.

**Agriculture Advisory Services**

Agriculture consulting, like other consulting services, is likely to expand in demand in the coming years. People with expertise and experience in a certain field of farming can consider providing consultancy services to businesses and farms.

**Production of Animal Feed**

This is a small-scale manufacturing operation. If you have faith in the distribution system, you can establish this business to profit from livestock feed production.

**Goat and Cow Fodder Production**

Any agricultural product used expressly to feed domesticated livestock, such as chickens, horses, pigs, cattle, and goats, is referred to as fodder. The word refers to food that is fed to animals rather than food that they find on their own.

**Planting Assistance**

You can start a business based on planting crops even if you don't have your own farm.



**सौ लिला हर्षद सोनवणे**
मोबाईल : ९९२१९८८०१४९
प्रशिक्षण समन्वयक
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र ,नाशिक.

# घे भरारी

**Be A Game Changer**

भारत हा युगानुयुगे अनेक हुशार, बुद्धिमानी व शौर्यवती स्त्रियांच्या कर्तृत्वाची परमगाथा साजरा करणारा देश आहे. मग त्या मैत्रेयी व गार्गी असोत, झाशीची राणी असो, अहिल्याबाई होळकर असो, राजमाता जिजाऊ असोत, सावित्रीबाई फुले किंवा रमाबाई आंबेडकर, इथली प्रत्येक स्त्री शिलेदार कर्तृत्वाचे सोनेरी प्रतीक आहे. संयम, व्यवस्थापन, दूरदृष्टी, धोरणी वृत्ती व करारी बाणा मुळातच भारतीय स्त्री च्या रक्तात आहे. सुधा मूर्ती, वीणा गवाणकर, प्रीती शेनोय या व आशा अनेक विचारवंत महिला आपल्या देशाचे भूषण आहेत. प्रत्येकीने योग्य वेळी आपला लढा ताकदीने दिला.

आता वेळ आलीये प्रत्येक घरातील स्त्री ने चांदा कोचर, इंदू नूयी, अदिती गुप्ता होण्याची. स्वतःमध्ये उद्योजिका या भूमिकेसाठी आवश्यक असलेले सर्व कौशल्य आत्मसात करण्याची. अर्थात शासन वेळोवेळी आपल्यासाठी या संधी उपलब्ध करून देतच आहे , प्रशिक्षण कार्यक्रम, योजना, आर्थिक सहकार्य, अनुदान, वस्तू व सेवांच्या विक्रीसाठी वेगवेगळे उपक्रम, प्रोत्साहन भत्ता असे सर्व पर्याय उपलब्ध आहेत.

प्रत्येक गाव, तालुका तसेच शहर पातळीवर उद्योजकता केंद्र, जिल्हा उद्योग केंद्र, आदिवासी विकास केंद्र व NGO किंवा सामाजिक संस्था स्त्रियांना उद्योजकतेचे प्रशिक्षण, मार्गदर्शन व पुढील काळात सहकार्य करण्यासाठी तयार असतात. आता तर यासर्व गोष्टींची माहिती ऑनलाइन देखील उपलब्ध आहे.

शासनाच्या विहित प्रणाली नुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आपण या सुविधांचा लाभ घेऊ शकता. वेगवेगळे वस्तू बनविण्याचे किंवा सेवा पुरविण्याचे प्रशिक्षण घेऊन कमीतकमी भांडवलात व्यवसायाची उभारणी करणे शक्य झाले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हे प्रशिक्षण घेतल्या नंतर उद्योजकता विकास प्रशिक्षण अत्यंत आवश्यक असते. आपण व्यवसाय सुरू करू पण त्यात काही निर्णय चुकल्याने नुकसान होऊ नये किंवा सुरू केलेला व्यवसाय योग्य गतीने चालावा यासाठी आपल्या वस्तू व सेवांची विक्री किंमत ठरवण्यापासून ते सादरीकरण, मार्केटिंग कसे करावे? मार्केट सर्व्हे, स्पर्धा, आवश्यक परवाने, लेखा जोखा, वित्त व्यवस्थापण, जसा जसा व्यवसाय वाढत जाईल तसे तसे लागणारे मनुष्यबळ, आर्थिक मदत या सर्व गोष्टी शिकून, समजून व्यवसाय सुरू केल्यास नक्की यश मिळेल.

राष्ट्रीय महिला सशक्तीकरण धोरणानुसार पुढील क्षेत्रांमध्ये उत्तम उद्योग व्यवसायासाठी संधि उपलब्ध आहेत.

शेती व पूरक व्यवसाय, अन्न व फख प्रक्रिया, शिवणकाम, एम्ब्रॉयडरी, जरी चे काम, खण चे कपडे, हॅन्डी क्राफ्ट, बांबू पासून बनवलेल्या वस्तू, हाताने बनवलेल्या भेटवस्तू, ज्वेलरी, सौन्दर्य प्रसाधने, फुले व त्यापासून शोभिवंत भेट वस्तू बनविणे यासंबंधीची उत्पादने संगणक व माहिती तंत्र ज्ञान, प्रवास व यात्रा, आदरातिथ्य यांत येणाऱ्या सेवा.

**Focus Sectors**

- Agriculture
- Automobiles
- Banking & Finance
- Biotechnology
- Chemicals
- Dyestuff sector
- Engineering
- Entertainment
- Infrastructure
- IT / ITES
- Power
- Pharmaceuticals
- Textiles
- Tourism
- Water Recycling

१. प्रधान मंत्री रोजगार निर्मिती योजना (पीएमईजीपी)
२. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (सिएमईजीपी)
३. मुद्रा योजना
४. खादी, ग्राम आणि कुटीर उद्योग योजना
५. उद्योजकता व कौशल्य विकास कार्यक्रम
६. राष्ट्रीय लघु उद्योग योजना NSIC
७. SFURTI (स्कीम ऑफ फंड रिजनरेशन ऑफ त्रडीशनल इंडस्ट्रीज)
८. ASPIRE ( अ स्कीम ऑफ प्रोमोशन ऑफ इनोवेशन, रुरल इंडस्ट्रीज अन्ड इंटरप्रिनुअरशिप

या सर्व योजनांमध्ये सबसिडी म्हणजे अनुदान प्राप्त करणे देखील शक्य असते. आपले चार्टर्ड अकाऊंटंट CA आपल्याला योग्य तो प्रोजेक्ट रीपोर्ट बनवून बँके समोर सादर करण्याकरता मदत करतात व सकारात्मक मांडणी केल्या मुळे आपली आर्थिक मदत करणे सोपे होते .




**CA राम डावरे,**
मोबाईल नंबर : ९०४९७८६३३३.

व्यवसायासाठी कुठली फर्म निवडायची आणि त्यासाठी कुठले कुठले पर्याय उपलब्ध आहे. नवीन व्यवसाय सुरू करताना उद्योजकाला तो व्यवसाय कुठल्या फर्म मध्ये सुरू करायचा यामध्ये नेहमी गोंधळ असतो. फर्म निवडायची कुठली त्याचे फायदे तोटे काय हे जाणून घेऊन मगच कुठल्या फर्म मध्ये व्यवसाय करायचा हे ठरविले पाहिजे. बऱ्याच नवीन उद्योजकांना उद्योग सुरू करायचा असतो परंतु पुढे कसे जायचे हे माहीत नसते. व्यवसाय सुरू करताना एखादी फर्म निवडणे व व त्या फर्म च्या नावाने जे काही बेसिक परवाने असतात ते काढणे त्या फर्म च्या नावाने बँकेत अकाउंट ओपन करणे अशा काही बेसिक गोष्टींनी व्यवसायाची सुरुवात होते. यासंदर्भात आपण जरा विस्तृत माहिती घेऊ या

व्यवसायासाठी फर्म निवडताना खालील पर्याय उपलब्ध असतात

१. वैयक्तिक मालकी फर्म (Proprietary firm)
२. पार्टनरशिप फर्म
३. एल एल पी
४. प्रायव्हेट लिमिटेड कंपनी
५. लिमिटेड कंपनी

असे पर्याय उपलब्ध आहे. सुरुवातीला कुठली फर्म निवडायची यात बराच गोंधळ होतो. व्यवसायासाठी फर्म निवडतांना काही खालील गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे .

१. भांडवल उपलब्धता
२. भागीदाराची एकमेकांसोबत असणारी ओळख.
३. फर्म रजिस्ट्रेशन साठी लागणार खर्च.
४. त्याची नोंदणीची पद्धत व नोंदणी साठी लागणार कालावधी.
५. एकदा फर्म तयार झाल्यानंतर त्याला वार्षिक जे काही ऑडिट, रिटर्न भरावे लागतात ते बघणे. (Annual compliance charges)
६. एक फर्म दुसऱ्या फर्म मध्ये कन्व्हर्ट करता येते की नाही हे सुद्धा बघणे गरजेचे असते.
७. प्रत्येक फर्मला भरावा लागणारा आयकराचा रेट हा सुद्धा वेगवेगळा आहे.
८. फर्म ला कोणते नाव द्यावयाचे हा पण एक महत्त्वाचा भाग आहे. वैयक्तिक फर्म (Proprietary firm) ला आपण कुठलेही नाव देऊ शकतो पण बाकी फर्म साठी नावाचे अप्रुवल घेणे गरजेचे असते ...

ह्या व अश्या अनेक गोष्टी फर्म निवडतांना विचारत घेणे गरजेचे असते .

वैयक्तिक फर्म मध्ये स्वतः एक व्यक्ती मालक असते तोच व्यवसायाचे सर्व निर्णय घेत असतो तोच व्यवसायासाठी भांडवल गोळा करत असतो जर व्यवसायात काही बरेवाईट झाले त्याची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर असते निर्णय पटकन घेता येतात वैयक्तिक फर्म ला जो काही मालक आहे त्याचा जो काही कराचा स्लॅब आहे त्यानुसार त्याला आयकर लागतो याउलट भागीदारी

फर्म मध्ये एकापेक्षा जास्त लोक एकत्र येतात भांडवल जास्त आणता येते कामाची विभागणी करता येते प्रत्येकाच्या विशिष्ट ज्ञानाचा फायदा व्यवसाय साठी होतो परंतु याच्यामध्ये एक महत्त्वाचा जो तोटा आहे तो म्हणजे भागीदारांन मधील एकमेकांचे भांडण आपल्या मराठी लोकांमध्ये दोन लोक लोक एकत्र आले की भिन्नता असतचे मग ती वैचारिक असेल व कुठली असेल ती असतेच त्यातून वाद होतात आणि मग व्यवसायात अडचणी सुरू होतात. दोन लोक एकत्र येण्या आधी प्रत्येकाला समजून घेणे गरजेचे असते प्रत्येकाचा आवाका काय, प्रत्येकाचा स्वभाव कसा, प्रत्येकाचे कौशल्य कसे , प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत कशी, या सर्व गोष्टी वरून एकमेकांशी जमेल की नाही हे ठरत असते. मग तुम्ही ही भागीदारी फर्म करा किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करा यामध्ये एकापेक्षा दोन लोकांची गरज असते आणि दोन लोक एकत्र आले की त्याचे फायदे आणि तोटे हे आलेत आणि म्हणून जेव्हा आपण भागीदारी फर्म करतो किंवा कंपनी करतो तेव्हा त्यावेळी कागदावरती अटी शर्ती लिहिणे (partnership deed, company memorandum etc.) फार महत्वाचा आहे त्या अटी शर्ती एकदम काटेकोरपणे लिहिणे जरुरी आहे कारण भविष्यात होणारे कुठलेही वाद होऊ नये यासाठी प्रत्येक गोष्टीचे विवेचन भागीदारी पत्रात येणे गरजेचे आहे म्हणजे पुढे जाऊन वाद होणार नाही व ते टाळता येतील. गरज पडल्यास ज्या बाबींमुळे भविष्यात वाद होऊ शकतात त्या बद्दल वेगळे असे MOU (memorandum of understanding) करा .

जसे आपण मुलांच्या लग्नाच्या वेळेस खूप चौकशी करतो तसेच व्यवसायात भागीदार घेतांना डायरेक्टर घेतांना तशीच चौकशी करावी, कुंडली पाहून घ्यावी म्हणजे व्यवसाय संसार सुखाचा सुरू राहील.


व्यवसाय सुरू करतांना आधी फर्म रजिस्ट्रेशन करा व मगच बाकी सर्व परवाने जसे की बँक करंट अकाउंट, पॅन नंबर, जीएसटीनंबर , शॉप ऍक्ट, उद्यम रजिस्ट्रेशन इ . घ्या.






# व्यापाऱ्यांसाठी निवृत्तीवेतनाची गरज ...!





श्री. मुकेश चोथाणी
(गुंतवणूक सल्लागार)
मोबाईल नं.:९८२२२७४९०७
Email : namaskar37@gmail.com

असे म्हणतात की व्यापारी/उद्योजक कधीच निवृत्त होत नाही परंतु कोरोनाच्या वेगवेगळ्या उद्‌भवलेल्या लाटांमुळे आणि हल्लीच्या विचित्र अर्थव्यवस्थेमुळे व्यापार अर्थकारण इ. च्या नवीन जडणघडणीतून लवकरच सेवानिवृत्ती घ्यावी लागते. कधी कधी घरगुती किंवा आरोग्याच्या आणि कोरोनानंतरच्या वातावरणांत आर्थिक प्रश्नांमुळे निवृत्ती (स्वेच्छानिवृत्ती) स्विकारावी लागते. वार्धक्यामुळे अथवा निवृत्तीमुळे प्रत्येकाच्या आयुष्यांत निवृत्तीवेतन (पेन्शन) प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युईटी मिळतेच असे नाही. व्यापारी व उद्योजकांनी याचा अतिशय काळजीने विचार करण्याची गरज आहे. वाढत्या महागाईमुळे आणि बदलत्या जीवनशैलीमुळे खर्चसुध्दा वाढले आहेत.

आपल्या संसाराची इमारत दीर्घकाळ टिकवण्यासाठी शरीर काम करते आणि उत्पन्न मिळते हेच उत्पन्न वेळीत गुंतवणूक सल्लागाराचा सल्ला घेऊन योग्य गुंतवणूक पर्यायांत वेळीच गुंतविलयास शरीर धकते थकते आणि उत्पन्नाचा ओघ कमी होतो तेव्हा निवृत्तीवेतनाच्या (पेन्शनच्या) रूपाने मिळाल्यास आपल्या शरीररूपी इमारतीला धोका उत्पन्न होत नाही. निवृत्तीचे नियोजन व्यवस्थित करण्यासाठी निवृत्तीवेतन (पेन्शन) चांगले मिळावे यासाठी आपले वय, आपली आयुमर्यादा, आपली जीवनशैली आत्ताची आणि निवृत्तीनंतरची आपल्यावर अवलंबून असलेले आपले कुटूंबीय आणि कर्मचारी, अवलंबित काळ, आपली जोखीम पात्रता आपले सध्याचे उत्पन्न आणि भविष्यतील उत्पन्न, औषधोपचाराचा खर्च यांचा सुमेळ लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

विशेषत: भारतात आयुष्यभर तुम्ही कितीही आयकर भरला तरी वृध्दापकाळात सरकार तुम्हाला निवृत्तीवेतन(पेन्शन) देणार नाही, याचा अर्थ तुम्ही आयकर भरू नये असा नसून आपल्या कमावत्या काळात आपण कमविलेला पैसा आपणास निवृत्तकाळात आपले वार्धक्य कसे सुरक्षित करेल अशा पध्दतीने गुंतवायला हवा. भारतात सध्या वयाच्या ६० व्या वर्षी निवृत्ती घेणाऱ्यांच्या खात्यात पेन्शनसाठी सरासरी ५-६ लाख असतात. सरकारी कर्मचाऱ्यांच्या खात्यात ही रक्कम सरासरी १३ लाखांची दिसते आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या खात्यात ही ५/६ लाख दिसते. औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या खात्यांत ही रक्कम सरासरी १८ लाख दिसते. पीएफआरडीए पेन्शन फंड रेग्युलेटरी ॲण्ड डेव्हलपमेंट ॲथोरिटी च्या अहवालात याचा उल्लेख आहे. खाजगी क्षेत्रातील (सर्वसामान्य नागरीक) निवृत्तीवेतनधारकांच्या खात्यात ही रक्कम फक्त ३ लाख(एनपीएस) खात्यात दिसते आहे. एनपीएसचे खाते एनएसडीएल सांभाळते. सरासरी ५/६ लाखांचे निवृत्तीयोग्य भांडवलावर मासिक एनपीएसचा प्रचलित व्याजदर ६.३१ टक्के धरला तर सर्वसाधारणपणे ३१५५ रूपये (मासिक) निवृत्तीवेतन ६ लाखावर शक्य आहे.

भारतात कमावत्या लोकसंख्येच्या फक्त १८ टक्केच लोकसंख्या आपल्या पेन्शनची काळजी करते. असोचेम (असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया) तर्फे आत्तापर्यंत जवळपास (२०१९ च्या आकडेवारीनुसार) सुमारे ९ हजार कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी पेन्शनसाठी एनपीएसमध्ये नोंदणी केली आहे. सुमारे १.५ (दिड कोटी) कर्मचारी याचा फायदा घेत असून सुमारे ३लाख ७५हजार कोटी रूपयांचे निवृत्तीयोग्य भांडवल जमा केले आहे.

केंद्र सरकारतर्फे पीएफआरडीएद्वारे एनपीएसचा पर्याय अतिशय सुंदर निवृत्तीवेतन गुंतवणूक पर्याय उपलब्ध आहे. याशिवाय वेगवेगळ्या विमा कंपन्यांद्वारे/ म्युच्युअल फंडाद्वारे/पोस्टाद्वारे आपण पेन्शनचा पर्याय घेऊ शकता कर बचतसुध्दा व्यवसाय/व्यापार/उद्योग आपण अवश्यक करावा परंतु आपल्या वृध्दापकाळासाठी भविष्यातील वाढती महागाई बदलते आर्थिक / उद्योग विश्व वाढते शिक्षणाचे खर्च आणि बदलती जीवनशैलीमुळे बहुतांश लोकांना या विषयाचे गांभीर्य कळालेच नाही असे म्हणावे लागेल. सरकारने सुद्धा असंघटीत क्षेत्रातील कमावत्या व्यक्तींना निवृत्तीसाठी निवृत्तीवेतनासाठी चेंबर्सच्या माध्यमाने प्रबोधन करण्याची गरज आहे. आपल्या कमावत्या काळात आपल्यापैकी प्रत्येकाने आपल्या निवृत्तीवेतनासाठी काही रक्कम निवृत्तवेतन योजना एनपीएस पेन्शन योजनांमध्ये टाकायलाच हवी अशी कळकळीची विनंती बघा पटतयं का?




कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी राज्य शासनाने लागू केलेल्या निर्बंधांची व्यापारी, उद्योजकांकडून कडक अंमलबजावणी केली जाईल, पण कोणत्याही परिस्थितीत राज्य सरकारने लॉकडाउन निर्णय घेऊ नये हा निर्णय व्यापारी व उद्योगांसाठी मारक ठरेल, अशी स्पष्ट भूमिका महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्य सरकारकडे मांडली आहे.

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्यात कोरोना रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेत या संसर्गाची फारशी माहीती नसल्याने योग्य त्या उपाययोजना करण्यास राज्य सरकारला विलंब झाला. त्यातच केंद्र सरकारनेही लॉकडाउन जाहीर केले. कालांतराने महाराष्ट्रातील रूग्णसंख्या आटोक्यात न आल्याने राज्य सरकारने पहिल्या व दुसऱ्या लाटेतही लॉकडाउन केले. या लॉकडाउनचा व्यापारीवर्गाला मोठा फटका बसला. आता तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने निर्बंधाचे पालन करा अन्यथा लॉकडाउन जाहीर करू असा इशारा दिला आहे.

या अनुषंगाने ललित गांधी यांनी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची पुणे येथे भेट घेतली. गांधी म्हणाले कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शासनस्तरावर जे प्रयत्न सुरू आहेत त्याला व्यापारी व उद्योजकांचा पाठिंबा आहे. शासन जे निर्बंध घालेल, त्याचे काटेकोर पालन केले जाईल, पण कोणत्याही परिस्थितीत लॉकडाउन करण्याला व्यापारी वर्गाचा पूर्णतः विरोध राहणार आहे.

कोरोनाचा सर्वाधिक फटका व्यापारी, उद्योजकांना बसल्याने तिसऱ्या लाटेत शासनाच्या निर्बंधांबरोबरच व्यापाऱ्यानी स्वतःची आचारसंहिता तयार केली आहे. ग्राहकांना मास्कशिवाय दुकानात प्रवेश दिला जात नाही. किंबहुना मास्क नसेल तर त्यांना साहित्यही दिले जात नाही. याशिवाय गर्दी न करणे, सॅनिटायझरचा वापर करणे, सोशल डिस्टन्सिंगचे पालन बंधनकारक केले आहे. दुकानात काम करणाऱ्या कामगारांचे लसीकरण केले आहे. ग्राहकांनी लस घेतली आहे की नाही याची माहीती घेउनच दुकानात प्रवेश दिला जातो, असे ललित गांधी यांनी मंत्री टोपे यांना सांगितले.

कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत लॉकडाउनमुळे व्यापार, उद्योग पूर्णपणे ठप्प झाला होता. शासनाची देणी भागविण्याबरोबरच कामगारांचे पगार देणे शासनाने सक्तीचे केले होते. लॉकडाउन शिथिल झाल्यानंतर दुकानात माल भरण्यासाठी व्यापाऱ्यांकडे पैसे नव्हते. केंद्र सरकारने आत्मनिर्भर योजना जाहीर केली. त्यामुळे बँकाकडून काही अटींवर कर्ज मिळाले, पण त्याचा फारसा फायदा झाला नाही. छोटे व मध्यम व्यापारी अजुनही कर्जाच्या ओझाखाली आहेत. तिसऱ्या लाटेची चाहूल लागली आहे. त्यामुळे शासन निर्बंधाचे पालन केले जाईल. पण लॉकडाउनला व्यापारी वर्गाचा विरोध कायम राहणार अशी भुमिका ललित गांधी यांनी मांडली आहे.

# संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे भेटीचे निमंत्रण



**केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथजी सिंह यांच्याशी चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी.**

नवी दिल्ली : केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज' च्या वतीने भेटीचे दिलेले आमंत्रण त्यांनी स्विकारले असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

संरक्षण क्षेत्रातील विविध उत्पादन प्रक्रियेमध्ये खाजगी क्षेत्राला संधी देण्याचे धोरण संरक्षण विभागाने स्वीकारले असून त्याअंतर्गत लघुउद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. या विविध संधींची माहिती व्हावी व संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांमध्ये महाराष्ट्राचा सहभाग वाढावा यासाठी विशेष आयोजन करण्यात येत असून त्या निमित्ताने संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी 'महाराष्ट्र चेंबर ला भेट द्यावी अशी विनंती ललित गांधी यांनी दिल्ली येथे यांच्यासमवेत झालेल्या भेटी प्रसंगी केली.

व्यापार उद्योग क्षेत्राची राष्ट्रीय शिखर संस्था फिक्कीच्या ९४ व्या वार्षिक समारोह निमित्त उपस्थित राजनाथ सिंग यांची ललित गांधी यांनी भेट घेतली.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' च्या अध्यक्षपदी ललित गांधी यांची निवड झाल्याबद्दल राजनाथ सिंग यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले, व लवकरच महाराष्ट्र भेटीचा कार्यक्रम निश्चित करू असे आश्वासनही दिले. याप्रसंगी फिक्की चे अध्यक्ष संजीव मेहता, मावळते अध्यक्ष उदय शंकर, माजी अध्यक्ष संदीप सोमानी, ज्योत्सना सूरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी चर्चा करताना ललित गांधी यांनी संरक्षण विभागातील पुरवठ्यामध्ये छोट्या शहरातील उद्योजकांना प्राधान्य देण्याबरोबरच पुरवठ्यासाठीच्या उपकरणांच्या यादीमध्ये वाढ करण्याची मागणी केली.

नाम. राजनाथ सिंह यांनी सध्या सुमारे २०० उत्पादने भारतीय उद्योजकांसाठी राखीव ठेवली असुन, भारतीय उद्योजकांसाठी राखीव उत्पादनांच्या प्रकार व संख्यमध्ये वाढ करण्याची मागणी योग्य असुन लवकरच याविषयीचा निर्णय जाहीर केला जाईल अशी ग्वाही दिली.

# ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’ च्या क्लस्टर प्रस्तावांना प्राधान्याने मंजुरी दिली जाईल - नाम. नारायण राणे



**केंद्रिय उद्योगमंत्री नारायण राणे यांना निवेदन देतांना अध्यक्ष ललित गांधी,वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, संदिप भंडारी.**

नवी दिल्ली : राज्याच्या व्यापार-उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणुन कार्यरत ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर’ च्या वतीने प्रस्तावित केलेल्या विविध उत्पादनांच्या क्लस्टर्स ना आवश्यक प्रक्रियेनंतर प्राधान्याने मंजूरी दिली जाईल अशी ग्वाही केंद्रीय MSME मंत्री नारायण राणे यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली चेंबरच्या मॅनेजिंग कमिटीतील वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, जीसी मेंबर संदिप भंडारी यांच्या शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे एसएसएमइ मंत्रालयात नाम. नारायण राणे यांच्या समवेत संयुक्त बैठकीत सहभाग घेतला त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी झालेल्या चर्चेत ‘महाराष्ट्र चेंबर’ तर्फे राज्याच्या सर्व सहा महसुली विभागात उत्पादन आधारीत एक क्लस्टर, कृषि प्रक्रिया उद्योगांवर आधारीत एक क्लस्टर, महिला उद्यमींसाठी विशेष क्लस्टर अशा प्रकारे क्लस्टर्स उभारणी करण्यात येणार असल्याची माहीती ललित गांधी यांनी दिली.

नाम. नारायण राणे यांनी एमएसएमइ मंत्रालयामार्फत महाराष्ट्राच्या उद्योग जगताला जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी आपण विशेषत्वाने प्रयत्नरत असल्याचे सांगितले.

यावेळी ललित गांधी यांनी नाम. नारायण राणे यांना महाराष्ट्र चेंबर ला भेट देण्यासाठी दिलेल्या आमंत्रणाचा त्यांनी सहर्ष स्विकार केला.

महाराष्ट्र चेंबर च्या वतीने क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी बनविलेल्या प्राथमिक प्रस्तावाची प्रत मंत्री महोदयांना सुपूर्द करण्यात आली.

# वस्त्रोद्योगावरील प्रस्तावित जीएसटी दरवाढ रद्द करण्यासाठी पुढाकार घेऊ : केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयल यांचे आश्वासन

नवी दिल्ली : वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रस्तावित जीएसटी वाढीचे दर कमी करण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वतीने जीएसटी कौन्सिलकडे प्रयत्न करून निर्णय मिळवला जाईल, असे आश्वासन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयल यांनी ललित गांधी यांना दिले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शुक्रवारी नवी दिल्ली येथे नामदार पियुष गोयल यांची भेट घेऊन त्यांना वस्त्र उद्योगासमोरील विविध समस्यांचे निवेदन सादर केले. विशेषता: वस्त्रोद्योगातील प्रस्तावित जीएसटी दरवाढीमुळे या उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता असून ही दरवाढ रद्द करणे आवश्यक असल्याचे आग्रही प्रतिपादन ललित गांधी यांनी केले.

केंद्रीय वाणिज्य, उद्योग, ग्राहक संरक्षण, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी वस्त्र उद्योगासमोरील अडचणींची सरकारने योग्य दखल घेतली असल्याचे सांगून, दरवाढीचा हा निर्णय जीएसटी कौन्सिलने घेतला असल्याने यासंदर्भात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे जीएसटी कौन्सिलकडे पाठपुरावा करून ही दरवाढ रद्द करून घेण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

नामदार पियुष गोयल यांनी वस्त्रोद्योग क्षेत्रात विशेषता: तांत्रिक वस्त्रोद्योग वगैरेसारख्या नवीन क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध असून आगामी काळात 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने' पुढाकार घेऊन नवीन संधीची माहिती व्यापार-उद्योग क्षेत्रापर्यंत पोहोचवावी व अधिकाधिक लोकांना नव्या संधीचा फायदा करून द्यावा असे आवाहन केले.



**केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयाल यांना निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत पंकज पटेल व अन्य मान्यवर**

याप्रसंगी 'फिक्की'चे माजी अध्यक्ष झायडस कॅडीला चे चेअरमन पंकज पटेल, महाराष्ट्र चेंबर चे कार्यकारिणी सदस्य मनप्रीत नागी, दिल्ली प्रतिनिधी जे.के.जैन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

# कपड्यावरील दरवाढ स्थगितीबद्दल सरकारचे आभार : ललित गांधी

जीएसटी कौन्सिलने कपडे व फूटवेअर वरील ५ टक्के चा जीएसटी एक जानेवारी पासून १२ टक्के करण्याचा निर्णय घेतला होता या निर्णयामुळे देशभरातल्या कापड व फुटवेअर व्यापाऱ्यांध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली होती.

३१ डिसेंबर रोजी झालेल्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत कपड्यावरील दरवाढ स्थगित ठेवण्याचा निर्णय केल्याबद्दल 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी जीएसटी कौन्सिलला धन्यवाद दिले. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे केंद्रीय अर्थत्री, वस्त्रोद्योग मंत्री यांच्यासह जीएसटी कौन्सिल च्या देशातील सर्व राज्यांच्या सदस्य अर्थत्र्यांना यासंबंधी निवेदन दिले होते. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी यासंबंधी पुढाकार घेऊन ही स्थगिती मिळवून दिल्याबद्दल ललित गांधी यांनी पियुष गोयल यांचे विशेष आभार मानले.

वस्त्रोद्योगातील दरवाढीचा प्रस्ताव जीएसटी च्या दर पुनर्रचना समितीकडे अभ्यासासाठी पाठवण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. या समितीने फेब्रुवारीपर्यंत आपला अहवाल द्यावयाचा आहे.

जीएसटी कौन्सिलने कपड्यावरील दरवाढ पुढे ढकलली, ही गोष्ट जरी स्वागतार्ह असली तरी ही दरवाढ रद्द करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून ललित गांधी यांनी वस्त्रोद्योग व फुटवेअर या दोन्ही वरील दरवाढ रद्द करावी अशी आग्रही मागणी केली असून, 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' च्या वतीने यासाठी पुन्हा पाठपुरावा केला जाईल असे सांगितले.

# महाराष्ट्राच्या पोर्टस् विकासाबरोबर ड्राय पोर्टस् विकासासाठी विशेष योजना बनवु - नाम. सर्वानंद सोनोवाल

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ला दिले आश्वासन



केंद्रीय पोर्ट विकास, जलवाहतुक मंत्री नामदार सर्वानंद सोनोवाल यांच्या चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत जे.के. जैन

महाराष्ट्राच्या विस्तृत समुद्र किनाऱ्याचा व्यापार, उद्योग वाढीसाठी सुनियोजित उपयोग करण्याबरोबरच पोर्ट ट्रस्टच्या मालकीची बंदरे, खाजगी विकासकांनी विकसित केलेली बंदरे यांच्या दीर्घकालीन विकासाच्या नियोजनासह ड्राय पोर्टस् चे सध्याचे जाळे योजनाबध्द रीत्या विकसित करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही केंद्रीय पोर्ट विकास, जलवाहतुक व आयुष खात्याचे कॅबिनेट मंत्री नाम. सर्वानंद सोनोवाल यांनी दिली.



केंद्रीय पोर्ट विकास, जलवाहतुक मंत्री नामदार सर्वानंद सोनोवाल यांना निवेदन देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत जे.के. जैन

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर चे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील शिपींग इंडस्ट्रीमध्ये विकासाच्या असलेल्या संधींची माहीती देउन चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या या क्षेत्रातील भरीव कामगिरीची माहीती विशद केली. तसेच महाराष्ट्रात नवीन ड्राय पोर्टस (इनलॅन्ड कन्टेनर पोर्ट) ला मंजुरी थांबवलेली आहे, ती पुन्हा सुरू करण्याची मागणी याप्रसंगी केली.

नाम. सर्वानंद सोनोवाल यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले व महाराष्ट्र चेंबर च्या विविध प्रस्तांवावर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन देऊन. लवकरच चेंबर ला भेट देऊ असे सांगितले. यावेळी झालेल्या चर्चेत ट्रस्ट बोर्ड चे चेअरमन अशिष पेडणेकर, चेंबरचे दिल्ली प्रतिनिधि जे. के. जैन यांनी सहभाग घेतला.

# महाराष्ट्र चेंबर ला राज्याच्या विकासात महत्वाची भुमिका पार पाडण्याची संधी - नाम. नितिन गडकरी

## चेंबर च्या कार्यक्रमास उपस्थितीथी स्विकृती



केंद्रीय परिवहन मंत्री नाम. नितिन गडकरी यांना निवेदन देवुन चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी

महाराष्ट्रामध्ये उद्योग, व्यापार, कृषि प्रक्रिया, सेवा क्षेत्र या सर्वच विभागांमध्ये विकासासाठी अमर्याद संधी आहेत. राज्याची शिखर संस्था म्हणुन कार्य करणाऱ्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ला विकासाच्या या संधी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करण्याची महत्वाची संधी आहे. चेंबरकडे ती क्षमता आहे. त्याचा योग्य व प्रभावी वापर करावा अशी सुचना केंद्रीय परिवहन मंत्री व ज्येष्ठ नेते नाम. नितिन गडकरी यांनी चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांना केली.

महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे नाम. नितिन गडकरी यांची भेट घेतली. त्या प्रसंगी झालेल्या चर्चेत त्यांनी ही सुचना दिली.

ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या फेब्रुवारी २०२२ मधील कार्यक्रमासाठी नाम. नितिन गडकरी यांना दिलेल्या आमंत्रणास त्यांनी स्विकृती दिली. याप्रसंगी चेंबरचे दिल्ली प्रतिनिधि जे. के. जैन व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसंबंधी महाराष्ट्र चेंबर च्या सुचना महत्वपुर्ण - नाम. रावसाहेब दानवे

## चेंबरच्या पदाधिकाऱ्यां समवेत बैठक संपन्न



केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री नाम. रावसाहेब दानवे यांना निवेदन देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत पदाधिकारी

महाराष्ट्रातील प्रलंबित रेल्वे प्रकल्प व नवीन रेल्वे प्रकल्पांसंबंधी महाराष्ट्र चेंबर ने मांडलेल्या सुचना विशेषतः मालवाहतुकीसंबंधी सहभाग वाढविण्यासाठीच्या सुचना स्वागतार्ह असुन रेल्वे मंत्रालयातर्फे या सुचनांचा प्राधान्याने विचार करू अशी ग्वाही केंद्रीय मंत्री रेल्वे व खाण राज्यमंत्री नाम. रावसाहेब दानवे यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी नवी दिल्ली येथे रेल्वे राज्यमंत्री यांच्या समवेत संयुक्त बैठक संपन्न झाली त्याप्रसंगी ते बोलत होते.

ललित गांधी यांनी विविध प्रस्ताव मांडताना नाशिक-पूणे सुपरफास्ट गाडी, नाशिक-पूणे नवीन रेल्वे मार्ग, कोल्हापूर - पूणे व कोल्हापूर - मुंबई सुपरफास्ट तसेच कोल्हापूर - वैभववाडी हा कोकण रेल्वेला जोडणारा मार्ग या सेवांविषयी लवकर कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली.

यावेळी झालेल्या चर्चेत ट्रस्ट बोर्ड चे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, सदस्य संदिप भंडारी यांनी सहभाग घेतला.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने अर्थसंकल्पासंबंधी दिलेल्या सुचनांवर सकारात्मक विचार करू - नाम. भागवत कराड

## महाराष्ट्र चेंबर च्या पदाधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठकीत ग्वाही



केंद्रिय मंत्री भागवत कराड यांच्याशी राज्यातील व्यापार उद्योगांच्या विषयावर चर्चा करतांना अध्यक्ष ललित गांधी व पदाधिकारी

महाराष्ट्राच्या व्यापार-उद्योग क्षेत्राची शतकमहोत्सवी शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाची सरकारला जाणीव असुन आगामी अर्थसंकल्पासंबंधी तसेच महाराष्ट्रातील व्यापार-उद्योग जगताच्या अपेक्षासंबंधी केलेल्या मागण्यांबाबत अर्थ मंत्रालय योग्य व सकारात्मक विचार करेल अशी ग्वाही केंद्रीय अर्थ राज्यमंत्री नाम. भागवत कराड यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांशी नवी दिल्ली येथे नॉर्थ ब्लॉक येथील अर्थ मंत्रालयात केंद्रीय अर्थ राज्यमंत्री नाम. भागवत कराड संयुक्त बैठक संपन्न झाली त्याप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी अर्थ संकल्पाबाबत च्या अपेक्षांचे निवेदन देऊन चर्चा करताना कर रचनांमध्ये सुधारणा, तांत्रिक अडचणींचे निवारण, आयकर मर्यादा वाढ, उत्पादन क्षेत्रासाठी कर्ज व्याजात सवलत, बँकींग व्यवस्थेतील सुधारणा, रिअल इस्टेट क्षेत्रासाठी नवीन आयकर सवलत योजना आदी मुद्दे मांडले.



नाम. नाम. भागवत कराड यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा पुष्पगुच्छ देउन सत्कार केला

यावेळी झालेल्या चर्चेत ट्रस्ट बोर्ड चे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, सदस्य संदिप भंडारी यांनी सहभाग घेतला.

यावेळी नाम. नाम. भागवत कराड यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी व वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांचा पुष्पगुच्छ देउन सत्कार केला व कारकीर्दीच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने दिलेल्या पर्यटनविषयक प्रस्तावावर प्राधान्याने विचार करू - नामदार आदित्य ठाकरे

### लवकरच संयुक्त बैठक आयोजित करण्याची ग्वाही





**महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण, पर्यटन मंत्री नाम. आदित्य ठाकरे यांना निवेदन देताना अध्यक्ष ललित गांधी. चेंबरच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यां समवेत नाम. आदीत्य ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या**

राज्याच्या व्यापार उद्योग व सेवा क्षेत्राची शिखर संस्था म्हणून कार्यरत असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' या संस्थेने महाराष्ट्राच्या पर्यटन विकासासाठी सुचविलेल्या विविध प्रस्तावावर प्राधान्याने विचार करू असे आश्वासन महाराष्ट्राचे पर्यटन पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री नामदार आदित्य ठाकरे यांनी अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील पर्यटनाच्या विकासासाठी विविध प्रस्तावांचे निवेदन नामदार आदित्य ठाकरे यांना सादर केले व या विषयी चर्चा करण्यासाठी संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी केली.

नामदार आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर ने दिलेल्या प्रस्तावांचा शासनाचे धोरणांमध्ये समावेश करण्यासाठी चेंबर चे पदाधिकारी यांच्या समवेत पर्यटन विभागाची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करू असे आश्वासनही यावेळी दिले. यावेळी चेंबरच्या ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, शुभांगी तिरोडकर, सुधाकर देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## आमदार चंद्रकांत जाधवांची धक्कादायक 'एक्झिट' राज्यातील उद्योगजगताचे नुकसान - ललित गांधी

व्यापारी-उद्योजकांचा विधिमंडळातील आवाज, हक्काचा घरचा माणुस म्हणुन उद्योजक म्हणुन यशस्वी झाल्यानंतर राजकारणात यशस्वी सुरूवात केलेले आमदार चंद्रकांत जाधव यांचा राजकारण प्रवेश जसा अचानक झाला त्याहीपेक्षा धक्कादायक अशी त्यांची चटका लावणारी 'एक्झिट' राज्याच्या व्यापार-उद्योगजगातचे नुकसान करणारी ठरली असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्षपदासाठी मी फॉर्म भरतांना आमदार जाधवांना सांगितले की उद्योगजगताचा विधिमंडळातील प्रतिनिधि राज्याच्या चेंबर मध्ये सोबत असणे मला आवश्यक आहे. त्यांनी तात्काळ होकार दिला ते गव्हर्निंग काऊन्सील वर बिनविरोध निवडुन ही आले. चेंबरच्या काऊन्सिल ची येत्या ७ डिसेंबर ची पहिली बैठक होण्यापुर्वीच ते निघुन गेले यावर विश्वासच बसत नाही.



**कै.आमदार चंद्रकांत जाधव**

कोल्हापूर चेंबर चा मी अध्यक्ष असताना ते माझे सहकारी उपाध्यक्ष होते. त्यांच्यासारखा सहकारी पुन्हा राज्यस्तरावर मिळाल्याचा आनंद हिरावुन घेतला गेला याचे दुःख आहे

# 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज'चे महिला उद्योजकता धोरण जाहीर

## – जागतिक महिला उद्योजकता दिनानिमित्त ललित गांधी यांची घोषणा

मुंबई : महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योग क्षेत्राची शिखर संस्था महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅयण्ड अॅग्रीकल्चर तर्फे जागतिक महिला उद्योजकता दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्रासाठी महिला उद्योजकता धोरण जाहीर करण्यात आल्याची माहीती महाराष्ट्र चेंबर चे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता धोरणामध्ये प्रामुख्याने खालील उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

- महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र चेंबरतर्फे उपलब्ध करून दिले जाईल.
- राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजिकांसाठी उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधी, राज्य व केंद्र सरकारच्या योजना याविषयी माहीती देण्यासाठी मार्गदर्शन केंद्र येत्या दोन वर्षात सुरू करण्यात येतील.
- महिलांना त्यांच्या उत्पादनांच्या निर्मितिसाठी सर्व सुविधायुक्त जागा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र महिला उत्पादन क्लस्टर्स ची उभारणी केली जाईल.
- महिलांची उत्पादने विक्रिसाठी संपुर्ण राज्यात विक्री व प्रदर्शन केंद्र उभारली जातील.
- विविध बँकांबरोबर सकार्य करार करून महिलांसाठी प्रकल्प उभारणी कर्ज सवलतीच्या व्याजदरात उपलब्ध करून दिले जाईल.
- महिला उत्पादन क्लस्टर्स व विक्रि व एक्झीबिशन सेंटर्स निर्मिती चा कालबध्द कार्यक्रम निश्चिमत केला असुन २०२२ मध्ये नाशिक, नागपुर, लातुर, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व २०२३ मध्ये जळगांव, कोल्हापूर, सोलापूर, गडचिरोली, अकोला, जालना या जिल्ह्यात केंद्रांचा प्रारंभ केला जाईल. उर्वरीत सर्व जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने २०२७ या चेंबरच्या शताब्दि वर्षापर्यंत ही योजना पुर्ण करण्यात येईल.
- महाराष्ट्र चेंबरच्या अंतर्गत राज्यस्तरीय महिला विभागाबरोबरच चेंबरच्या सहा विभागात विभागीय महिला समिति कार्यान्वित केल्या जातील.

चेंबरच्या ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्षा शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या कोअर समितिच्या मार्गदर्शनाखाली महिला उद्योजकता धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहीती देऊन ललित गांधी म्हणाले की २०२२ मध्ये नाशिक मधील महिला उद्योजकता क्लस्टर च्या उद्घाटनापासुन याच्या अंमलबजावणीची सुरूवात केली जाईल.

# महाराष्ट्र - गोवा व्यापार वृध्दिसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' सोबत संयुक्त उपक्रमास सहकार्य - गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत

## ललित गांधी यांना दिले आश्वासन




**महाराष्ट्र-गोवा आंतरराज्य व्यापार वृध्दि चा प्रस्ताव गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना देऊन चर्चा करताना ललित गांधी सोबत भरत गांधी, योगेश केरकर व अन्य**

महाराष्ट्र व गोवा या दोन्ही शेजारी राज्यांत सांस्कृतिक व व्यापारी, ऋणानुबंध असुन आंतरराज्य व्यापार-उद्योग वृध्दिसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' ने दिलेल्या विविध संयुक्त उपक्रमांच्या प्रस्तांवासाठी सहकार्य करू अशी ग्वाही गोव्याचे मुख्यमंत्री नाम. प्रमोद सावंत यांनी ललित गांधी यांना दिली.

गोव्याचे मुख्यमंत्री नाम. प्रमोद सावंत १ जानेवारी २०२२ रोजी कोल्हापूर दौऱ्यावर आले असता 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांची भेट घेऊन 'महाराष्ट्र' व 'गोवा' या दोन राज्यात उद्योग-व्यापार-पर्यटन व आय.टी. क्षेत्रात सहयोगासंबंधी विविध योजनांचा प्रस्ताव सादर केला त्याप्रसंगी ते बोलत होते.

या प्रस्तावावर पुढील निर्णयासाठी लवकरच 'पणजी' येथे 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या पदाधिकाऱ्यांसमवेत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल असेही मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी नमुद केले. यावेळी भेटलेल्या शिष्टमंडळात भरत गांधी, योगेश केरकर, परशुराम सातार्डेकर, दर्शन गांधी यांचा समावेश होता.

# महाराष्ट्र राज्य हे पूर्वीपासून भारताच्या विकासाचे इंजिन आहे आणि राहील – जयंत पाटील, जलसंपदा मंत्री




महाराष्ट्र राज्य हे पूर्वीपासून भारताच्या विकासाचे इंजिन आहे आणि राहील. भौगोलिक दृष्ट्या आताची परिस्थिती बदलली आहे. शेजारील गुजरात, कर्नाटक या राज्याचा विकास चांगला झाला आहे. इतर राज्याच्या तुलनेत गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र राज्यालाच पहिली पसंती आहे. राज्यात गुंतवणूक यावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. शेजारील राज्य पुढे गेल्याचा आभास आहे. गेल्या २-३ दशकांचा अनुभव आहे कि, राज्यातील गुंतवणूक इतर राज्यात गेली तरी त्याची उणीव भरून काढतो. नवीन उद्योग येण्यासाठी कामगार कायद्यात सूट देणे आवश्यक आहे. गुंतवूणक वाढावी व व्यापार उद्योगांच्या विकासासाठी आपल्याला लवचिक धोरण स्वीकारावे लागेल. राज्यात पायाभूत विकासाचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात सुरु आहेत त्यामुळे मुंबईचे अंतर कमी होणार आहे. त्यामुळे राज्याच्या विकासाला अधिक गती मिळेल असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री श्री जयंत पाटील यांनी वालचंद स्मृती व्याख्यानमालेतील ४९ वे पुष्प ''महाराष्ट्र - भारताच्या विकासाचे इंजिन'' याविषयावर गुंफताना केले.

वालचंद व्याख्यानात पुढे ते म्हणाले कि, जीएसटीमुळे व्यापाऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. व्यापारी व जीएसटी विभागात पैसे भरण्याचा वाद असतांना व्यापाऱ्यास तुरूंगात जावे लागत असल्याच्या घटना वर्तमानपत्रात वाचनात येत आहे. व्यापारी व जीएसटी विभागात विश्वासाचे नाते असणे आवश्यक आहे त्याचा अभाव आहे. याबाबत महाराष्ट्र चेंबरने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा. आपल्याकडे संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळत नाही. त्यासाठी महाराष्ट्र चेंबरने अभियांत्रिकी महाविद्यालये, संस्था यांच्याशी समन्वय करून उद्योगांच्या तांत्रिक अडचणी सोडवाव्यात तसेच संशोधनास प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले. तसेच महाराष्ट्र चेंबरची शताब्दीकडे वाटचाल सुरु राज्यातील व्यापार उद्योगांच्या विकासात सातत्याने अतिशय चांगले व गौरवास्पद कार्य महाराष्ट्र चेंबरने केल्याचे गौरवोद्‍गार त्यांनी काढले.

महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद यांनी स्वदेशी उद्योग सुरु केले. ते दूरदर्शी होते म्हणून आजही त्यांचे नाव घेतले जाते. महाराष्ट्र चेंबरसारखे मोठे व्यासपीठ उद्योजकांना त्यांनी दिले. आजच्या वालचंद व्याख्यानमालेत त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँण्ड अग्रिकल्चरतर्फे मंगळवार दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी वालचंद स्मृती व्याख्यानमालेतील ४९ वे पुष्प जलसंपदा मंत्री श्री जयंत पाटील यांनी महाराष्ट्र - भारताच्या विकासाचे इंजिन याविषयावर गुंफले.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा, वरिष्ठ उपाध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उमेश दाशरथी, रविंद्र माणगावे, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, नाशिक शाखा चेअरमन संजय दादलिका, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे तत्कालीन अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी स्वागत केले व वालचंद स्मृती व्याख्यानमालेची थोडक्यात माहिती दिली. तसेच महाराष्ट्र चेंबरने विद्यार्थी व उद्योगांची गरज ओळखून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी बिझनेस सोल्युशन्स पॉलीक्लीनिक प्रोग्राम सुरु केला असून राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये व संस्था यांच्याशी समन्वय करून विद्यार्थी व उद्योजकांमध्ये समन्वय साधला असून विध्यार्थ्यांना तज्ञ उद्योजक मार्गदर्शन करत असल्याचे सांगितले. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांचा परिचय महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष ललित गांधी यांनी करून दिला व प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची व उपक्रमांची माहिती दिली. उपाध्यक्ष रविंद्र माणगावे यांनी आभारप्रदर्शन केले.

व्याख्यानास व्यापारी, उद्योजक, महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य व प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे, सचिव सौ. प्रेरणा उगले, उपसचिव नितीन शेलार उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या अध्यक्षपदी निवडीनंतर प्रथम आगमनप्रसंगी ललित गांधी यांचे कोल्हापूर रेल्वे स्टेशनवर जल्लोषी स्वागत




**कोल्हापुरात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे नुतन अध्यक्ष ललित गांधी यांचे रेल्वे स्थानकावर जल्लोषी स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापार-उद्योग क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कोल्हापुरात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे नुतन अध्यक्ष ललित गांधी यांचे रेल्वे स्थानकावर जल्लोषी स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापार-उद्योग क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यातील व्यापारी उद्योजकांची शिखर संस्था 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर' च्या 'अध्यक्ष'पदी निवड झाल्यानंतर प्रथमच कोल्हापुरात आलेल्या ललित गांधी यांचे रेल्वे स्टेशनवर शेकडो च्या संख्येने उपस्थित मान्यवरांनी अत्यंत उत्साहात व जल्लोषात स्वागत केले.

कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष संजय शेटे, शिवाजीराव पोवार, हरिभाई पटेल, धनंजय दुग्गे, अतुल पाटील, सीमा शहा, संभवनाथ मंदीर ट्रस्ट, गुजरी चे अध्यक्ष नरेंद्र ओसवाल व राजेश धनराज, राजारामपुरी व्यापारी असोसिएशनचे रणजित पारेख, रमेश कारवेकर, अमित लोंढे, क्रिडाई इचलकरंजी चे नितिन धुत, ज्येष्ठ नेते महावीर गाठ, हुपरी व्यापारी असोसिएशन चे पदाधिकारी, कापड व्यापारी असोसिएशन, वडगाव चे किशोर राठोड, उद्योगपती सतिश माने, मोबाईल ऑपरेटर असोसिएशन चे जितेंद्र शहा, महावीर एज्युकेशन सोसायटीचे महेश सामंत, धनश्री व्हनागडे, निलम जाधव, गणेश बाटे इ. उपस्थित होते.

शतकमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या राज्यव्यापी शिखर संस्थेचे नेतृत्व करण्याची कोल्हापूर ला प्रदीर्घ काळानंतर संधी मिळाल्याचा आनंद सर्वांनी जल्लोष करून व्यक्त केला. निवडीनंतर प्रथमच आगमन प्रसंगी ईचलकरंजी आमदार प्रकाश आवाडे यांनीही ललित गांधी यांचे स्वागत करून सत्कार केला.




# नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी पदभार स्वीकारला



**नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी सेक्रेटरी जनरल सागर नागरे यांच्याकडून पदभार स्विकारला. यावेळी मॅनेजिंग कमिटी चे सर्व सदस्य उपस्थित होते.**

शतक महोत्सवाकडे वाटचाल करीत असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' या राज्यातील व्यापार उद्योगाच्या शिखर संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत राज्यातील सर्व जागावरील निवडणूक बिनविरोध संपन्न झाली. या निवडणूक प्रक्रियेत बिनविरोध निवडून आलेले नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी 'संविधान दिनाचे' औचित्य साधून व्यवस्थापन समितीच्या बैठकीत अध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

चेंबरच्या ट्रस्ट बोर्डचे चेअरमन **आशिष पेडणेकर,** वरिष्ठ उपाध्यक्ष - **उमेश दाशरथी** (औरंगाबाद), उपाध्यक्ष - **करुणाकर शेट्टी** (मुंबई १), उपाध्यक्ष - **शुभांगी तिरोडकर** (मुंबई २), उपाध्यक्ष - **सुधाकर देशमुख** (नाशिक-उत्तर महाराष्ट्र), उपाध्यक्ष - **रवींद्र मानगावे** (सांगली-पश्चिम महाराष्ट्र), विशेष निमंत्रित- **चंद्रशेखर पुनाळेकर** (सिंधुदुर्ग-कोकण) या मान्यवरांच्या उपस्थितीत चेंबरचे सेक्रेटरी जनरल सागर नागरे यांनी नूतन अध्यक्ष ललित गांधी यांना अध्यक्षपदाचा पदभार सोपविला. यावेळी संपन्न झालेल्या मॅनेजिंग कमिटीच्या बैठकीत विविध विषयावर विचारविनिमय करून, आगामी काळातील चेंबर ची वाटचाल निश्चित करण्यासाठी विशेष धोरण तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी समितीचे सदस्य यांचा शपथ ग्रहण सोहळा, 'कार्यकारिणी समितीची सभा' व 'विशेष सर्वसाधारण सभा' असा संयुक्त समारोह लवकरच आयोजित करण्यात येणार असून, तत्पूर्वी गव्हर्निंग कौन्सिल च्या नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय व त्यांना चेंबरच्या कामकाजाची माहिती व्हावी, यासाठी येत्या आठवड्यात ऑनलाइन बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. यासंबंधीची माहिती कार्यकारिणी समितीच्या सर्व सदस्यांना लवकरच कळविण्यात येईल.

# महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाचा रोडमॅप तयार करावा - प्रतापसिंह जाधव

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागातील व्यापार-उद्योग-कृषी क्षेत्राच्या समस्या व संधी यांचा एकत्रित विचार करून संपुर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठीच्या रोडमॅप ललित गांधी यांनी प्राधान्याने करावा अशी सुचना दै. पुढारीचे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव यांनी केली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्टी ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी मार्गदर्शनासाठी दै. पुढारीचे संपादक श्री. प्रतापसिंह जाधव यांची भेट घेतली त्याप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्राच्या रोडमॅप तयार करताना कोल्हापूरात एखादा महत्वपुर्ण पायलट प्रोजेक्ट आणण्यासाठी विशेष पुढाकार घ्यावा अशी सुचनाही प्रतापसिंह जाधव यांनी ललित गांधी यांना केली. यावेळी कोल्हापूरातील उद्योजक सतिश जयसिंगराव माने, जितेंद्र शहा, कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष संजय शेटे यावेळी उपस्थित होते. ललित गांधी यांनी दै. पुढारी व श्री.



**दै. पुढारीचे संपादक मान. श्री. प्रतापसिंह जाधव यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार केला. यावेळी सतिश माने, जितेंद्र शहा उपस्थित होते.**

प्रतापसिंह जाधव यांनी आजवर केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देऊन पुढील काळात मार्गदर्शन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# ‘व्यापारी वर्गावर लादलेली दंडाची अन्यायी तरतूद रद्द करू’
## – खा. शरद पवार यांचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळास आश्वासन



कोरोनाच्या नव्या संकटाला रोखण्याच्या निमित्ताने राज्य सरकारने जारी केलेल्या नवीन नियमावलीमध्ये लसीकरण पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींना पाचशे रुपये दंड व दुकानांमध्ये लसीकरण पूर्ण न केलेला ग्राहक आढळल्यास दहा हजार रुपये दंडाची केलेली तरतूद हे राज्यात व्यापारी वर्गावर अन्याय करणारी असल्याने ती ताबडतोब रद्द करण्यात यावी यासाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख व खासदार श्री शरद पवार यांना महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने दिले.

याप्रसंगी खा. शरद पवार यांनी मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून लवकरच दंडाची तरतूद रद्द करू असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांना महाराष्ट्राच्या विकासातील व्यापारी, उद्योजकांच्या योगदानाची कदर असून या घटकांच्या समस्यांची योग्य ती जाणीव सुद्धा आहे. त्यामुळे स्वतः शरद पवार यांनीच आश्वासन दिल्याने व्यापारी, उद्योजकांवर लादलेली दंडाची तरतूद लवकरच रद्द होईल याचा विश्वास वाटतो. अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या निमित्ताने व्यक्त केली.

शिष्टमंडळात नाशिक शाखा चेअरमन सुनिता फाल्गुने,कार्यकारणी सदस्य संजय राठी,नेहा खरे,सोनल दगडे, मनिष रावल आदी उपस्थित होते.

# अन्यायी दंड आकारणी रद्द करण्यासाठी नाम. छगन भुजबळ व आम. देवयानी फरांदे यांना निवेदन सादर





कोरोनाच्या नव्या संकटाला रोखण्याच्या निमित्ताने राज्य सरकारने जारी केलेल्या नवीन नियमावलीमध्ये लसीकरण पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींना पाचशे रुपये दंड व दुकानांमध्ये लसीकरण पूर्ण केलेला ग्राहक आढळल्यास दहा हजार रुपये दंडाची केलेली तरतूद हे राज्यात व्यापारी वर्गावर अन्याय करणारी असल्याने ती ताबडतोब रद्द करण्यात यावी अशी मागणी पालकमंत्री श्री. छगन भुजबळ व आमदार देवयानी फरांदे यांच्याकडे उपाध्यक्ष श्री सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, नाशिक शाखा चेअरमन सौ. सुनीता फाल्गुने, संजय सोजनवणे, कार्यकारिणी सदस्य हेमंत गायकवाड, रविंद्र छोपे, भरत येवला, राजाराम सांगळे, सोनल दगडे, रोहीणी नायडू, संजय राठी, व्हिनस वाणी, रवि जैन, मिलिंद राजपूत, स्वप्निल जैन, कॅटचे प्रफुल्ल संचेती, विकास पगारे, वैशाली शहा, सहा. सचिव अविनाश पाठक उपस्थित होते.

# जळगावचे पालकमंत्री नाम. श्री. गुलाबराव पाटील यांना दंड आकारणी विरोधी निवेदन



जळगावचे पालकमंत्री आमदार श्री. गुलाबराव पाटील यांची महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन राज्य सरकारने जारी केलेल्या नवीन नियमावलीमध्ये लसीकरण पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींना पाचशे रुपये दंड व दुकानांमध्ये लसीकरण पूर्ण केलेला ग्राहक आढळल्यास दहा हजार रुपये दंडाची केलेली तरतूद हे राज्यात व्यापारी वर्गावर अन्याय करणारी असल्याने ती ताबडतोब रद्द करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली. याप्रसंगी संगीता पाटील, नितिन इंगळे, पुरूषोत्तम तिवारी, दिलिप गांधी, संजय शाहा, सुनिल


*With Best Compliments from*

**Mahendrakumar Pa**
77220050030

**Sachin Kute**
7720050033

**Virendrasing Pa**
7720050020

*The Logistics company*
[A Partnership Based on Trust]

# TGL Shipping Services Pvt. Ltd.

**CUSTOM BROKER & INTERNATIONAL FREIGHT FORWARDER**



**OFFICE ADDRESS**

**OFFICE NO.:** 308, 3RD FLOOR, BUSINESS CENTER, KARMAYOGI NAGAR,
GOVIND NAGAR, NASHIK- 422 009, MAHARASHTRA-INDIA
Mobile No.: 7720050020 / 7720050030 / 7720050033
E-mail : mahendra@tglshipping.com / sachin@tglshipping.com / viru@tglshipping.com
Website : www.tglshipping.com

# कोरोना काळातील व्यापारी, उद्योजक यांच्या वरील गुन्हे मागे घेण्याची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ची मागणी

## गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्याशी ललित गांधी यांनी केली चर्चा

कोरोना काळात निर्बंध पालना संबंधी व्यापारी व उद्योजकांवर झालेले गुन्हे त्वरित मागे घ्यावेत व २७ नोव्हेंबर रोजी सरकार ने जारी केलेल्या नवीन नियमावली अनुसार लसीकरण पुर्ण न केलेला ग्राहक दुकान, शोरूम अथवा कारखान्यात आढळल्यास ग्राहकास ५०० रुपये व दुकानदारास १०००० ते ५०००० रुपये दंडा ची तरतूद तात्काळ रद्द करण्यात यावी. असे निवेदन महाराष्ट्र चैंबर ऑफ कॉमर्स च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्राचे गृह मंत्री ना. दिलीप वळसे पाटिल यांना दिले.

यावेळी संदीप भंडारी, महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित सभासद विलास जैन, व फामचे बाळासाहेब कटारिया, कमलेश मेहता, इंदर छज्जेड, विनोद अहीर, निलेश भागवत, परेश शाह आदि उपस्थित होत.



गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना निवेदन देऊन चर्चा करतांना अध्यक्ष ललित गांधी, सोबत संदिप भंडारी, व अन्य मान्यवर

# महाराष्ट्र चेंबर व मॅजिक मध्ये सामंजस्य करार



मासिआ-मॅजिक करार प्रसंगी अध्यक्ष ललित गांधी, सोबत वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, मॅजिकचे संचालक आशिष गर्दे, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रि ॲण्ड ॲग्रिकल्चर व मराठवाडा ॲक्सिलेटर फॉरग्रोथ ॲण्ड इन्क्युबेशन कौन्सिलमध्ये दि. ३ जानेवारी २०२२ रोजी महाराष्ट्र चेंबरच्या मुख्य कार्यालय, मुंबई येथे सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र राज्यात शाश्वत व्यवसाय निर्माण करण्यासाठी विद्यमान छोटे व्यवसायाचा विकास करणे, नवीन संकल्पना, महिला उद्योजकता आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांत वाढ आणि स्टार्टअप्सला मार्गदर्शन व मदत करण्यासाठी हा करार करण्यात आला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या वतीने ललित गांधी यांनी तर मॅजिक च्या वतीने आशिष गर्दे यांनी करारावर सह्या केल्या


You can have everything you want in life if you just help enough people get what they want in life....
Congratulations to
President Shri. Lalit Ji Gandhi,
All Office Bearers and
all newly elected members
Mrs. Sangeeta PATIL
Governing Council Member - Maharashtra Chamber of Commerce & Industry & Agriculture
President - Tarka Foundation, Jalgaon
Member - SME Chamber of India (Mumbai)
Asst. Governor - Rotary International Dist 3030
Director - International Institute of Fashion Desiging, Jalgaon (INIFD)
Celebrity Judge - Bollywood Mr. & Mrs. India Contest, New Delhi (National Pageant)
+91 94 222 75 889
sangeeta.patil.9
sangeetapatil01
sangeeta30_

# हळद शेतमालाच्या व्याख्येत नसणे हास्यास्पद, जीएसटी लावण्याच्या निर्णयास विरोध - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स सर्व स्तरावर विरोध करणार

महाराष्ट्र जीएसटी च्या अग्रीम अभिनिर्णय प्राधिकरणाने (ॲडव्हान्स रूलींग ऑथोरीटी) हळद ही शेतमालात समाविष्ट होणार नाही असा निर्णय देणे हास्यास्पद असुन महाराष्ट्रातील हळद उत्पादक शेतकरी व व्यापाऱ्यांवर अन्यायकारक असल्याने 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' तर्फे या निर्णयास विरोध केला जाईल अशी माहीती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

हळद (हळद पावडर अतिरीक्त) विक्रिसाठी जीएसटी लागु होणार किंवा कसे यासंदर्भात अग्रि निर्णयासाठी सांगली येथील हळद अडत्यांनी दाखल केलेल्या प्रकरणात निर्णय देताना जीएसटी आयुक्त (AAR) यांनी हा निर्णय दिला असुन, हळद विक्रिसाठी अडत्यांना मिळणाऱ्या दलालीवरही जीएसटी भरावा लागेल असा निर्णय दिल्याने शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

ललित गांधी पुढे म्हणाले की, हळद कंद पिकविल्यानंतर शेतकरी स्वतः सदर हळद कंद वाळवुन बाजारात विक्रिसाठी आणतो, शेतमाल शेतातुन काढल्यानंतर बाजारापर्यंत पाठविण्यायोग्य आवश्यक सामान्य प्रक्रिया त्या वस्तुचे मुळ गुणधर्म बदलत नसतील तर तो शेतमाल व्याख्येतच गृहीत धरावा असे गुजरात व अन्य प्रकरणात पूर्वी निर्णय झालेले असताना महाराष्ट्राच्या प्राधिकृत आयुक्तांनी बरोबर उलट निर्णय दिला आहे ही बाब आश्चर्यकारक आहे.

महाराष्ट्राच्या हळद उत्पादक जिल्ह्यातील शेतकरी, बाजार समिती पदाधिकारी, हळद व्यापारी आदी संबंधित घटकांची संयुक्त बैठक 'महाराष्ट्र चेंबर' मध्ये लवकरच आयोजित करण्यात येत असुन या निर्णयाला कायदेशीर प्रक्रियेद्वारे व शासन दरबारी आव्हान देऊन हा निर्णय बदलण्यास भाग पाडावे लागेल असे ललित गांधी यांनी स्पष्ट केले.



# हळदीवर कर न लावण्यासाठी पाठपुरावा - ललित गांधी

## सांगली बाजार समितीस भेट, बाजार समितीकडून ललित गांधी यांचा सत्कार

सांगली : महाराष्ट्रातील सर्व बाजार समित्यांशी समन्वय साधून हळद हा शेतीमाल असून त्यावर कोणताहीकर न लावण्याबाबत पाठपुरावा करू, अशी ग्वाही महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

येथील सांगली कृषि उत्पन्न बाजार समितीला महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, संचालक भालचंद्र पाटील, स्वप्नील शहा यांनी भेट दिली. बाजार समितीचे सभापती दिनकर पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समिती सांगलीच्या कार्यक्षेत्रातील अडते व खरेदीदार यांना हळद या शेतीमालासाठी जी.एस.टी. ची आकारणी केली जात असल्यामुळे येणाऱ्या अडचणीबद्दल चर्चा करण्यात आली. बाजार समितीचे सभापती श्री. पाटील म्हणाले, हळद हा शेतीमाल असताना जीएसटी आयुक्त यांनी हळद हा मसाला पदार्थ म्हणून ग्राह्य धरून जीएसटी आकारणी केली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला हळदीस कमी भाव मिळत आहे. तसेच हळद ही फक्त मसाला पदार्थ नसून हळदीचा उपयोग हा औषधामध्ये तसेच धार्मिक कार्यामध्ये ही केला जातो. यासाठी शेतीमाल संबोधून जीएसटी माफ करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्फत शासन दरबारी प्रयत्न करावेत. बैठकीमध्ये सर्व अडते, व्यापारी यांनी त्यांच्या अडचणी मांडल्या त्यावर उत्तर देताना गांधी म्हणाले, महाराष्ट्रातील सर्व बाजार समित्यांशी या प्रश्नांबाबत समन्वय साधला जाईल. हळद हा शेतीमाल असून यावर कोणताही कर लावू नये यासाठी पाठपूरावा करू.



**सांगली बाजार समितीतर्फे ललित गांधी यांचा सत्कार करताना सभापती दिनकर पाटील, शेजारी भालचंद्र पाटील, संचालक वसंतराव गायकवाड, जीवन पाटील, बाळासाहेब बंडगर, स्वप्नील शहा आदि.**

यावेळी बाजार समितीचे संचालक वसंतराव गायकवाड, जीवन पाटील, प्रशांत पाटील, बाळासाहेब बंडगर, सचिव महेश चव्हाण तसेच अडत संघटनेचे अमर देसाई आदी उपस्थित होते.

# लक्ष्मी औद्योगिक वसाहतीत सुविधांसाठी सहकार्य - ललित गांधी

## MSME संदर्भात शासन धोरण व चेंबरची भुमिका






**स्लिमा च्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करताना संजय मालु, महेश दाते दुसऱ्या छायाचित्रात सभेला मार्गदर्शन करताना ललित गांधी.**

हातकणंगले येथील श्री लक्ष्मी सहकारी औद्योगिक वसाहतीतील रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे स्थापनेनंतर तब्बल २६ वर्षांनी आजही वसाहतीत पक्के रस्ते नाहीत हे भीषण वास्तव आहे या रस्त्यांबाबत आजवर अनेकांनी अनेक वेळा आश्वासने दिली असतील येत्या सहा महिन्यात वसाहतीमधील किमान ५०% रस्ते करुन देण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

श्री लक्ष्मी इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (स्लिमा) हातकणंगलेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संजय घोडावत विद्यापीठात पार पडली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, फाउंड्री आणि टेक्सटाईल हा शेतीनंतर सर्वात मोठा व्यवसाय म्हणून कोल्हापूरची जगभरात ओळख आहे इन्फ्रास्ट्रक्चरमुळे परिसराचा कायापालट होतो मात्र त्यात आपण कमी पडतो त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव जाणवतो कृती समितीच्या धमक्यांळे कोल्हापूरचे नाव सर्वत्र बदनाम झाले आहे सरकारमधील बरबटलेल्या नियंत्रणामुळे शासन धोरणांच्या अंलबजावणीवर विपरीत परिणाम होतो कच्च्या मालाच्या वाढत्या किमती उद्योगासमोरील मोठे संकट आहे ते दूर करण्यासाठी ही शासनाने पुढे येण्याची गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.

सुरुवातीस स्लिमाचे अध्यक्ष संजय मालू यांनी स्वागत व प्रास्ताविक पर भाषण केले मानद सचिव विनय मगदू यांनी असोसिएशनच्या कार्याचा आढावा घेतला तर सचिव अजय मनवाडे यांनी नोटीस वाचन केले.

यावेळी श्रीराम इंडस्ट्रीज चे मालक श्री. संदीप कांबळे सुप्रीम इंजिनियर्स चे मॅनेजर श्री. बुर्जे या यशस्वी उद्योजकांचा सत्कार करण्यात आला. शिवाय मॅग्ना इंडस्ट्रीचे पार्टनर श्री. सुनील बत्तासे यांना लाँगटर्म अचीवमेंट पुरस्काराने गौरवण्यात आले. यावेळी इतर पारितोषिके प्राप्त उद्योजक श्री. लोकेश जैन झांझरी पेपर प्रोडक्ट व श्री विनय मगदू व राहुल पाटील सिद्ध इंजिनिअरिंग यांचाही सत्कार करण्यात आला व गुणवंत विद्यार्थी श्री आदित्य कुगे याचा सत्कार करण्यात आला.

राजीव गोलंगडे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. आभार कार्याध्यक्ष विशाल मोरे यांनी मानले. यावेळी मॅक चे अध्यक्ष संजय पेंडसे, इचलकरंजी इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हेंत कुलकर्णी, उत्कर्ष उद्योजक संघटनेचे अध्यक्ष गणेश भांबे, वेस्टर्न महाराष्ट्र प्रोसेसिंग असोसिएशनचे गिरीराज मोहता, लक्ष्मी औद्योगिक वसाहतीचे संचालक निशिकांत भेंडवडे, व माजी चेअरमन दिलीप नाईक (सावनुरे), अजीज नेजकर, दत्तात्रेय म्हेतर, मुकुंद माळी तसेच स्लिमाचे उपाध्यक्ष महेश दाते, खजिनदार मिलिंद पाटील, संचालक शितल केटकाळे, श्यामसुंदर मर्दा, सुधीर गोलंगडे, अजित केटकाळे, मुबीन जमादार, धनंजय कुलकर्णी, राजेश धोंगडे, सौ.पूजा कुलकर्णी व बहुसंख्य उद्योजक सभासद उपस्थित होते.







**चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते यशस्वी उद्योजकांचा सत्कार करण्यात आला.**

## नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटनेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन संपन्न

नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटनेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. अरविंद्र नरसीकर व महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांच्या हस्ते पद्मश्री बाबुभाई राठी सभागृहात शनिवार दिनांक ११ डिसेंबर २०२१ रोजी संपन्न झाले.

कोरोना काळात किरकोळ किराणा व्यावसायिकांनी महत्वाची भुमिका बजावली असे जिल्हा पुरवठा अधिकारी नरसीकर म्हणाले. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष श्री. महेंद्रभाई पटेल, उपाध्यक्ष श्री. सुरेश मंत्री, कार्याध्यक्ष श्री. एकनाथ अमृतकर, सचिव विनी दत्ता उपस्थित होते.




जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. अरविंद नरसीकर यांचा सत्कार अध्यक्ष श्री. महेंद्रभाई पटेल यांनी केला तर महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांचा सत्कार उपाध्यक्ष श्री. सुरेश मंत्री यांनी केला. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य श्री. संजय राठी व नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटनेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्याध्यक्ष श्री एकनाथ अमृतकर यांनी केले.

## महाराष्ट्र चेंबरतर्फे आयकर आयुक्त गोयल यांचा सत्कार

### आयकर विभाग व्यापारी उद्योजकांना सहकार्य करेल - श्री. गोयल, आयुक्त, आयकर विभाग

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आयुक्त श्री. सतीश गोयल यांची भेट घेतली. याप्रसंगी व्यापारी व उद्योजकांना आयकर संबंधी येणाऱ्या विविध अडचणी व समस्यावर चर्चा केली. तसेच पुष्पगुच्छ देऊन आयुक्तांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना आयुक्त श्री. सतीश गोयल यांनी संपूर्ण आयकर विभागातर्फे व्यापारी उद्योजक उद्योजकांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.



शिष्टमंडळात श्री. शिवदास डागा, श्री. राजेंद्र कोठावदे, श्री. संजय महाजन, सीए असोसिएशनचे श्री. उल्हास बोरसे, श्री. राजेंद्र शेटे आदी उपस्थित होते. याप्रसंगी सुधाकर देशमुख व शिवदास डागा यांनी नाशिकमधील व्यापारी उद्योजकांना आयकर संबंधित असलेल्या विविध अडचणींची माहिती आयुक्तांना दिली तसेच व्यापारी उद्योजकांकडून संपूर्ण सहकार्य आयकर विभागाला नेहमीच केले जात असल्याचे सांगितले.

# ‘लोकमत इन्फ्रा कॉन्क्लेव्ह’मुळे राज्याच्या विकासाला नवी ऊर्जा मिळेल – ललित गांधी

मुंबई : लोकमत समूहाने आयोजित केलेल्या ‘महाराष्ट्र इन्फ्रा कॉन्क्लेव्ह’मध्ये विविध विषयांवर झालेले सादरीकरण महाराष्ट्राच्या विकासाचे अनेक पैलू उलगडणारे होते. या परिषदेमुळे महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळण्यासाठी आवश्यक ती ऊर्जा मिळाली आहे असे प्रतिपादन राज्याच्या व्यापार उद्योगाची शिखर संस्था असलेल्या ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर’ चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

ललित गांधी म्हणाले की, लोकमत समूहाचे चेअरमन माजी खासदार विजय दर्डा यांनी परिषदेचे उद्घाटन करताना मराठीतुन केलेले प्रभावी भाषण लोकमत समूहाचा राज्याच्या विकासासाठीचा सकारात्मक दृष्टिकोन अधोरेखित करणारे होते. विविध मंत्री महोदयांनी मांडलेली भूमिका व राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेले प्रभावी सादरीकरण या परिषदेसाठी उपस्थित असलेल्या उद्योग जगतातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना प्रभावित करणारे ठरले. राजेंद्र दर्डा यांचे मार्गदर्शन तसेच ऋषी दर्डा यांनी आदित्य ठाकरे यांच्याशी संवाद करताना मांडलेले प्रश्न अत्यंत प्रभावी होते. लोकमत समूहाद्वारे अशा प्रकारचे उपक्रम आयोजित केल्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला




**लोकमत इन्फ्रा कॉन्क्लेव्ह कार्यक्रमावेळी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचे स्वागत करताना मा. खासदार विजय दर्डा व अन्य**

नक्कीच मोठी मदत लोकमत इन्फ्रा कॉन्क्लेव्ह कार्यक्रमावेळी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचे स्वागत करताना मा. खासदार विजय दर्डा व अन्य होणार आहे. असे सांगून ललित गांधी यांनी संपादकीय विभागाबरोबर लोकमत च्या संपूर्ण टीमने या आयोजनासाठी केले प्रयत्न वाखाणण्यासारखे असल्याचे सांगितले. या परिषदेत महाराष्ट्र चेंबरच्या ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, उपाध्यक्ष शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्यासह मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नाशिक, पूणे, कोल्हापूर या भागातील प्रमुख पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

## भावपूर्ण श्रध्दांजली



**स्व.आमदार चंद्रकांत जाधव**

महाराष्ट्र चेंबर नवनिर्वाचित कार्यकारीणी सदस्य आमदार श्री. चंद्रकांत जाधव यांचे नुकतेच निधन झाले महाराष्ट्र चेंबरतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.



**कै.मधुकर जगन्नाथ मालपुरे**

महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य श्री. राजेश मालपुरे यांचे वडील श्री. मधुकर जगन्नाथ मालपुरे यांचे निधन झाले. महाराष्ट्र चेंबरतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.



**कै. कौशल्याबाई बुधमल संचेती**

महाराष्ट्र चेंबरचे सभासद व नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल संचेती यांच्या मातोश्री श्रीमती कौशल्याबाई बुधमल संचेती यांचे निधन झाले. महाराष्ट्र चेंबरतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

महाराष्ट्र चेंबरचे सदस्य श्री. अमर वझलवार यांचे बंधू श्री. अजित वझलवार यांचे निधन झाले. महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य श्री. रविंद्र हळदणकर याचे निधन झाले. महाराष्ट्र चेंबरतर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

# नाशिक कार्यकारीणी सदस्याचीं बैठक संपन्न



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या मार्गदर्शनानुसार चेंबरचे विविध पदाधिकारी राज्याच्या वेगवेगळ्या भागात दौरे करीत असून, विविध घटकांच्या भेटी घेत आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी व उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार दि. ३० डिसेंबर २०२१ रोजी नाशिक कार्यकारीणी सदस्यांची बैठक पद्मश्री बाबुभाई राठी सभागृह येथे संपन्न झाली. याप्रसंगी वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी यानीं महाराष्ट्र चेंबरच्या तज्ञ समित्यांची कार्य व रचना, कार्यकारीणी सदस्यांची कामे याची माहिती चित्रफितीद्वारे सदस्यानां दिली. उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांनी नाशिक विभागात झालेल्या विविध कार्यक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. माजी उपाध्यक्ष श्री. हेमंत राठी यांना जीवनगौरव पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यकारीणी सदस्य श्री. संजय राठी, श्री. हेमंत गायकवाड, श्री. राजेंद्र कोठावदे, श्री. वेदांशू पाटिल, श्री. श्रीधर व्यवहारे, श्री. दिलीपसिंग बेनिवाल, श्री. संदिप सोमवंशी, सौ. सोनल दगडे आदिंनी चर्चेत सहभाग घेऊन काही सुचना केल्या.

याप्रसगीं व्यासपीठावर वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी, उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख, माजी अध्यक्ष श्री. हेमंत राठी, श्री. संतोष मंडलेचा, सौ. सुनिता फाल्गुने, श्री. संजय सोनवणे उपस्थित होते.

बैठकीस नाशिकमधील कार्यकारीणी सदस्य व सभासद उपस्थित होते.




**जिंतूर जि. परभणी चे तहसिलदार एस. डी. मांडवगडे यांना निवेदन देऊन अन्यायी दंड करण्याची तरतूद रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य श्री. ब्रिजगोपाल तोष्णिवाल व सदस्यांनी केली.**

**'महाराष्ट्र चेंबर पत्रिका' हे प्रगतीचे व माहीतीचे माध्यम ठरावे असा प्रयत्न आहे.**
**या मासिकात अजुन कोणत्या बाबी असाव्यात याबाबत सुचना पाठवाव्यात.**
**महत्वपूर्ण विषयांवरील लेखांचेही स्वागत आहे.**
**आपल्या सुचना /लेख**
info@maccia.org.in
**या ई मेल वर पाठवाव्यात**

## महाराष्ट्र चेंबर च्या सिंधुदुर्ग पदाधिकाऱ्यांची नाम. राणे यांना सदिच्छा भेट

केंद्रीय सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग मंत्री सन्माननीय नाम. श्री नारायणराव राणे साहेब यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे कार्यकारिणी सदस्य श्री चंद्रशेखर पुनाळेकर, श्री मनोज वालावलकर, श्री अशोक सारंग आणि सदस्य श्री. भुषण नाबर यांनी सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यादरम्यान सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी श्री राणे साहेब यांच्यासोबत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील व्यापार, उद्योग विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण चर्चा झाली, तसेच विशेष चर्चेसाठी दिल्ली येथे येण्याचे आमंत्रण दिले.



## आमदार श्री. वैभव नाईक यांना निवेदन



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरचे चंद्रशेखर पुनाळेकरयांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार श्री. वैभव नाईक यांचीभेट घेऊन कोरोनाच्या नव्या संकटाला रोखण्याच्या निमित्ताने राज्य सरकारने जारी केलेल्या नवीन नियमावलीमध्ये लसीकरण पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींना पाचशे रुपये दंड व दुकानांमध्ये लसीकरण पूर्ण केलेला ग्राहक आढळल्यास दहा हजार रुपये दंडाची केलेली तरतूद हे राज्यात व्यापारी वर्गावर अन्याय करणारी असल्याने ती ताबडतोब रद्द करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली. मनोज वालावकर, भालचंद्र राऊत, महेश मांजरेकर उपस्थित होते.

## सातपूर औद्योगिक वसाहतीतील नाईस एरियातील रस्त्याच्या कामास सुरवात

सातपूर औद्योगिक वसाहतीतील नाईस एरियात रस्ता क्रमांक अ हा खराब झाल्यामुळे नव्याने रस्ता तयार करण्याच्या कामाची मागणी सातत्याने केली होती त्यानुसार महानगरपालिकेतर्फे नाईस एरियातील रस्ता क्रमांक अ चे काम सुरू केले आहे. परिसरातील मारूती मंदिराजवळ मोठा चौक झाल्यामुळे नियमित अपघात होत असतात. अपघात रोखण्यासाठी येथे महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्य मिलिंद राजपूत, कैलास पाटील, अंबादास चौरे, संदिप काळे आदि उद्योजकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री. रंजन ठाकरे यांच्याकडे या रस्त्यावर गतिरोधक टाकण्याची मागणी केली. याप्रसंगी महानगरपालिकेचे सुपरवायझर श्री. सोनवणे हे उपस्थित होते.



# ❋ हार्दिक अभिनंदन ❋



सुविचार मंच या सामाजिक संस्थेतर्फे महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. हेमंत राठी यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरतर्फे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी, उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख, माजी अध्यक्ष श्री. संतोष मंडलेचा यांनी माजी अध्यक्ष श्री. हेमंत राठी यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. समवेत नाशिक शाखा चेअरमन सौ. सुनिता फाल्गुने, को-चेअरमन श्री. संजय सोनवणे.



भारतीय बँकींग व्यवस्थेतील सर्वात मोठी व राष्ट्रीयीकृत बँक **स्टेट बँक ऑफ इंडिया** च्या **संचालक पदी** भारत सरकारने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे गव्हर्निंग काउन्सिल सदस्य **श्री. प्रफुल्ल छाजेड (सीए)** यांची नियुक्ती केली आहे.चेंबर साठी ही अत्यंत अभिमानाची व गौरवास्पद घटना असुन राज्यातील सर्व सभासद व पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन

## नाशिक मोटर मर्चंट असोसिएशनच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन



नाशिक शहरातील समस्त ऑटोमोबाईल व्यापारी यांची संघटना नाशिक मोटर मर्चंट असोसिएशनचा वार्षिक दिनदर्शिका प्रकाशन सोहळा नाशिक पश्चिमच्या आमदार सौ. सीमा हिरे व महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष श्री. सुधाकर देशमुख आणि को-चेअरमन श्री. संजय सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना महाराष्ट्र चेंबर उपाध्यक्ष श्री सुधाकर देशमुख यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे नाशिक मोटर मर्चंट असोसिएशनला त्यांच्या सर्व उपक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

दिनदर्शिका प्रकाशन समिती अध्यक्ष श्री कैलाश चावला यांनी दिनदर्शिका तयार करण्यात ज्यांनी मोलाची कामगिरी बजावली त्यांचे आभार मानले. संस्थेची कार्यकारी समिती चंद्रकांत सानप दिपक दोडे, विजय ठाकूर, सचिन चव्हाण, योगेश झगडे, सुनील शहा, उपस्थित होते.

या प्रकाशन सोहळा प्रसंगी संस्थे चे माजी अध्यक्ष श्री गुरुमित सिंग रावल, मनीष गनोरे, प्रशांत हातेकर, किशोर गांग, दिलीप भंडारी, आशिष कालरा, टोनी आचरा, लकी बग्गा उपस्थित होते. आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव श्री जयंत पाटील यांनी केले.



## श्री. ललित गांधी

अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर

कोल्हापूर येथील प्रथितयश व्यावसायिक व सामाजिक कार्यातील अग्रणी नेतृत्व श्री. ललित गांधी यांची महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. श्री. ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारणी सदस्य, तज्ञ समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्य केलेले असून महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारीणी समितीवर २००० पासून कार्य करत आहेत.

व्यापारी-उद्योजकांच्या न्याय मागण्यांसाठी, संरक्षणासाठी आक्रमकपणे लढणारे लढवय्ये नेते म्हणून देशभर ख्यातीप्राप्त श्री. गांधी गेले ४० वर्षे व्यवसायात असून गेली ३६ वर्षे सामाजिक कार्यात सक्रियपणे कार्यरत आहेत.

श्री. ललित गांधी हे देशभरातील ७ कोटी व्यापाऱ्यांची शिखर संस्था कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) चे 'राष्ट्रीय संगठन मंत्री' म्हणुन जबाबदारी पाहात असुन, वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रो व एज्युकेशन (वेसमॅक)चे अध्यक्ष व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स (केसीसीआय) या संस्थेचे माजी अध्यक्ष आहेत. फिक्की, असोचेमचे , इंडियन मर्चंटस् चेंबर चे कार्यकारिणी सदस्य आहेत. श्री. गांधी हे २६ वर्षांपासून राजारामपुरी मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून पदभार सांभाळत आहेत. सामाजिक क्षेत्रात जितो, ग्लोबल मारवाडी चॅरिटेबल फाऊंडेशन (मिशन कॅन्सर कंट्रोल-इंडिया) या संस्थांचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. मॅफकॉसचे माजी अध्यक्ष, महावीर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष, भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या सीपीसीएसईए समितीतर्फे शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), पीडी ॲग्रि. युनिर्व्हसिटी (अकोला), शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (कोल्हापूर व मिरज), कृष्णा मेडिकल कॉलेज (कराड), गर्व्हमेंट फार्मसी कॉलेज (कराड), एस. पी. गोगटे कॉलेज (रत्नागिरी), केएलई मेडिकल कॉलेज (बेळगाव), जेजे मगदूम कॉलेज (जयसिंगपूर) या संस्थांच्या समित्यांवर भारत सरकारचे प्रतिनिधीत्व करत आहेत.

त्यांनी जपान, थायलंड, फ्रान्स, इंग्लंड, मॉरिशस, अमेरिका, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ या देशांना भारताच्यावतीने व्यापार प्रतिनिधी मंडळांद्वारे भेटी दिल्या आहेत. त्यांना सहकार भूषण राष्ट्रीय पुरस्कार, नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार, राजीव गांधी एक्सलन्सी ॲवॉर्ड, भगवान महावीर अहिंसा पुरस्कार २०१४, जैन समाजरत्न पुरस्कार २०१५ आदि पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

२०१५ साली तत्कालीन राष्ट्रपती माननीय श्री. प्रणव मुखर्जी यांच्यासमवेत 'स्वीडन' दौऱ्यात तसेच २०१८ साली माननीय राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्यासमवेत 'ग्रीस' दौऱ्यावर जाण्याचीही त्यांना संधी मिळाली. तसेच २०१८ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत आफ्रीका दौऱ्यावर जाण्याची संधी देखील मिळाली.

स्वतःच्या बांधकाम, रिअल इस्टेट व कृषि पुरक उद्योगां व्यतिरीक्त सहकार, बँकींग इ. विविध क्षेत्रातील प्रचंड अनुभव व अभ्यासामुळे विविध विषयांवर मार्गदर्शन व अभ्यासपूर्ण मांडणीसाठी त्यांची विशेष ख्याती आहे.



## श्री. उमेश दाशरथी

वरिष्ठ उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर

महाराष्ट्र चेंबरच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलेले आहे. श्री. उमेश दाशरथी यांचे शिक्षण मॅकेनिकल इंजिनियर व एम. बी. ए. (मार्केटिंग) झाले आहे. रूचा इंजिनिअरिंग प्रा. लि. या कंपनीचे ते कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. श्री. दाशरथी यांना ऑटोमोटिव्ह आणि ऑटो कॉम्पोनंट इंडस्ट्री, होम फर्निशिंग इंडस्ट्री, सर्व्हिस सेक्टरमधील २८ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव आहे. नवीन प्लान्टची उभारणी, नवीन उत्पादन प्रक्रिया, मशिनरी आणि प्लान्टची निवड, नवीन उत्पादने तयार करणे या कामाचे त्यांना अतिशय चांगले ज्ञान आहे.

श्री. उमेश दाशरथी हे मराठवाडा उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते. मराठवाडा ऑटो क्लस्टरचे चेअरमन आहेत. तसेच इतर अनेक औद्योगिक संघटनांमध्ये सक्रिय आहेत. त्यांनी मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्षपद भूषविले असून ते बजाज ऑटो व्हेंडर्स असोसिएशनचे मॅनेजिंग कमिटी मेंबर, मराठवाडा एन्व्हायरमेंट केअर क्लस्टरचे उपाध्यक्ष, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे सदस्य, सी. आय. आय.चे सदस्य या संस्थांमध्ये ते कार्यरत आहेत. श्री. उमेश दाशरथी अभ्यासू आणि उत्कृष्ट वक्ते असून त्यांनी महाराष्ट्रात आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक संस्था आणि संघटनांमध्ये व्याख्याने दिली आहेत.

श्री. उमेश दाशरथी यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये सन २०१७ मध्ये बेस्ट ग्लोबल महाराष्ट्रीय आंत्रप्रुनर्सशिप ॲवार्ड, बेस्ट एमएसएमई ॲवार्ड, मराठवाडा गौरव पुरस्कार सन २०११ त्यांना मिळाला आहे. त्यांनी मॅनेजर्स डायरी या पुस्तकाचे लेखन केले असून नवउद्योजकांना ते अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरत आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी अमेरिकेस भेट दिली. त्यावेळी त्यांच्यासोबत गेलेल्या शिष्टमंडळात श्री. उमेश दाशरथी यांचा सहभाग होता. या दौऱ्यादरम्यान त्यांनी मायक्रोसॉफ्ट, जनरल मोटर्स, गुगल, सिटी बँक आदि कंपन्यांना दिल्या. तसेच न्यूयॉर्क, सॅन फ्रॅन्सिको या ठिकाणी बिझनेस मिटिंगमध्ये सहभाग घेतला. त्याचबरोबर मा. मुख्यमंत्री महोदयांसोब जपानला गेलेल्या दौऱ्यातही ते सहभागी झाले होते. याठिकाणी कानसाई इकॉनॉमिक फेडरेशन, ओसाका चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री येथे भेट देऊन चर्चेत सहभाग घेतला होता. तसेच कोयासन विद्यापीठाला त्यांनी दिली होती.

श्री. दाशरथी यांचा विविध सामाजिक उपक्रमात मोठा सहभाग असतो. जलसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड यासारखे उपक्रम ते मराठवाडा विभागात राबवत असतात. वाळुंज औद्योगिक परिसरात ५० हजार रोपांची लागवड करण्यात आली आहे व त्यांचे संवर्धनही करण्यात आले आहे. पंतप्रधान स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ वाळुंज अभियान त्यांनी राबविले. यामध्ये १२ हजार जणांनी सहभाग नोंदवला होता.



## श्री. करूणाकर शेट्टी
उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर (मुंबई-१)

चेंबरच्या उपाध्यक्षपदी मुंबई येथील करूणाकर शेट्टी यांची दुसऱ्यांदा निवड झाली आहे. श्री. करूणाकर शेट्टी हे गेली अनेक वर्ष चेंबरशी संबंधित आहेत. कार्यकारीणी सदस्य म्हणूनही त्यांनी ६ वर्ष काम केलेले आहे. श्री. करूणाकर शेट्टी हे लॉजिस्टिक ॲण्ड शिपिंग व्यवसायात ३५ वर्षांपासून आहेत. शिप एअर फॉरवर्डर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे ते चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक आहेत. बृहन्मुंबई कस्टम ब्रोकर्स असोसिएशनचे ते माजी अध्यक्ष आहे. असोसिएशन ऑफ सप्लाय चैन प्रोफेशनलस् इन इंडियाचे माजी सहसचिव आहेत. तसेच ते पोईसुर जिमखाना, मुंबई उपनगर मल्लखांब असोसिएशन, मुंबई उपनगर जिमनॅस्टिकस् असोसिएशनचे ते उपाध्यक्ष आहेत.

महाराष्ट्रच्या व्यापर उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्या बद्दल भारताचे माजी संरक्षण मंत्री स्वर्गीय श्री. मनोहर परिकर, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण व जलसंपदा मंत्री श्री. जयंत पाटील ह्यांनी वेळोवेळी प्रशंसा पत्र देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

कोरोना काळात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रचे माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर ह्यांच्या



## सौ. शुभांगी तिरोडकर
उपाध्यक्षा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर (मुंबई-२)

महाराष्ट्र चेंबरच्या मुंबई विभाग २ च्या उपाध्यक्षा म्हणून सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झालेल्या आहे. सौ. शुभांगी तिरोडकर ह्या बी.एस्.सी. पदविधर आहे, आणि पदवीपर्यंतचे शिक्षण एलफिन्स्टन आणि विल्सन कॉलेज मुंबईमधून पूर्ण झाल आहे. त्यांनी आपल्या करीअरची सुरूवात ७० च्या दशकात लंडन येथे केली. सन १९८० मध्ये त्या एअर इंडियामध्ये एअरहोस्टेस म्हणून रूजू झाल्या. त्याच काळात त्यांचा विवाह मुंबई येथील प्रसिध्द सिमेंट व्यावसायिक श्री. दिलीप तिरोडकर यांच्याबरोबर झाला. मुळातच उद्योजकतेची आवड असलेल्या शुभांगीताईंनी एअर इंडियातील नोकरी सोडून सन १९८२ पासून आपल्या कौटुंबिक व्यवसायात लक्ष देण्यास सुरवात केली.

बकुल बिल्डिंग सोल्युशन्स आणि बायोटेक न्यूट्री फार्मा लिमिटेड कंपनीच्या संचालिका आहेत. २००८ साली बकुल बिल्डिंग सोल्युशन्सने कन्स्ट्रक्शन केमिकल्स आणि इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी सिस्टम्स विभाग सुरू केले. टिसा टेक सिक्युअर प्रा. लि. ही सिक्युरिटी सिस्टिमची नवीन कंपनी सुरू केली व नावारूपास आली. बदलत्या काळानुसार आता बकुल रिअल इस्टेट रिटेल क्षेत्रात उतरली आहे. कौटुंबिक जबाबदारी सांभाळत पती सोबत त्या सिमेंटचा व्यवसाय करत आहे. तसेच नवी मुंबई स्वयंसेवी संस्थेच्या कोषाध्यक्ष, सिडको मनस्वी स्त्री संसाधन केंद्र, साहित्य संस्कृती मंदिर संस्था, आम्ही उद्योगिनी संस्थेच्या शाखा प्रमुख, मराठी व्यापारी मंडळ आणि सामाजिक संस्थान मध्ये त्या योगदान देत आहे.

उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. गेली दोन वर्ष उपाध्यक्ष पदाची धुरा सांभाळत असतांना त्यांनी ठाणे संपर्क केंद्राची, पालघर संपर्क केंद्र, दिपस्तंभ हेल्पलाईन सुरु करण्यास त्यांचा मोठा वाटा आहे. चेंबरच्या नवी मुंबई कार्यालयाच्या उभारणीत त्यांचा मोलाचा हातभार आहे. महाराष्ट्र चेंबरच्या सर्व सभासदांमध्ये समन्वय ठेवणे व सर्वांना एकमेकांप्रती आदराने व प्रेमाने एकत्र ठेवण्यास त्या बांधील असून चेंबरच्या शताब्दी वर्षात चेंबरची दमदार वाटचाल करण्याच्या दिशेने त्या कार्यरत आहेत.



## श्री. सुधाकर देशमुख
उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर (उत्तर महाराष्ट्र)

महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या उपाध्यक्षपदी नाशिक येथील श्री. सुधाकर देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. सातपूर औद्योगिक क्षेत्रात अनंत एंटरप्राईजेस व यशवंत इंजिनिअरींग वर्क्स या दोन कंपन्यांच्या माध्यमातून यशस्वी व्यावसायिक वाटचाल सुरू आहे. गेल्या १५ वर्षांपासून महाराष्ट्र चेंबर व नाशिक इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, अंबड इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन या संस्थांच्या माध्यमातून व्यापार-उद्योगांचे प्रश्न यशस्वीपणे हाताळले. नाशिक इंडस्ट्री ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

या संस्थांच्या पायाभूत सुविधा समिती, क्रिडा समिती, ऊर्जा समिती तसेच अन्य महत्वाच्या समित्यांचे अध्यक्षपद भूषविले आहे. रेल्वे ग्राहक समन्वय समितीच्या माध्यमातून रेल्वे ग्राहकांचे प्रश्न संबंधित स्तरावर मांडून निवारण केले.

सुकर्ता परिषदेच्या माध्यमातून उद्योजकांचे अनेक आपआपसातील वाद सामोपचाराने मिटवण्यात यशस्वी. निमा या औद्योगिक संस्थेच्या निमा इंडेक्स, निमा पॉवर, बँक समिटसारख्या महत्वकांक्षी अनेक उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक उद्योग वाढीसाठी यशस्वी प्रयत्न केले.



## श्री. रविंद्र माणगावे
उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर (पश्चिम महाराष्ट्र)

सांगली येथील प्रसिध्द उद्योजक श्री. रविंद्र माणगवे यांची चेंबरच्या पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या उपाध्यक्षपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. श्री. रविंद्र माणगवे यांचे शिक्षण बी. कॉम. एमबीएपर्यंत झाले आहे. आयात, निर्यात, रिअल इस्टेट या व्यवसायात ते कार्यरत आहेत. त्यांनी चेंबरचे कार्यकारीणी सदस्य तसेच चेंबरच्या इंटरनॅशनल रिलेशन समितीचे चेअरमन म्हणून काम केलेले आहे. याशिवाय ते एसआरएम इलाईट एंटरप्राईजेसचे भागीदार आहेत. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. ते दक्षिण भारत जैन सभा सांगलीचे माजी उपाध्यक्ष आहेत. एसआरएम फाऊंडेशनचे अध्यक्ष आहेत. कर्मवीर आरोग्य अभियानाचे संस्थापक आहेत. सांगली जिल्ह्यातील सावळवाडी या गावाचे सर्वात तरूण सरपंच म्हणून ते निवडून आले होते. त्यांच्या कार्यकाळात सावळवाडी गावास शासनाच्या विविध योजनांचे पारितोषिके मिळाली आहेत. एक आदर्श गाव म्हणून लौकिक प्राप्त झाला आहे. राज्याच्या व्यापारी व औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून कार्य करत आहेत.



## श्री. चंद्रशेखर रवळनाथ पुनाळेकर
उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर (कोकण)

महाराष्ट्र चेंबरच्या कोकण विभागाच्या उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झालेली आहे. श्री. चंद्रशेखर रवळनाथ पुनाळेकर रा. कुडाळ जि. सिंधुदुर्ग वय ४७ वर्ष बागायतदार शेतकरी आहे. तसेच ते वेंगुर्ला प्रोड्युसर कंपनीचे संचालक असून आंबा विकास बचत गटाचे अध्यक्षही आहेत, ते शेतीपूरक उद्योग धंद्यांचे पुरस्कर्ते आहेत ते स्वतः आंब्याचे प्रोसेसिंग करून आंब्याचा पल्प, पोळी ई. बनवतात तसेच कोकम पासुन रतंबा हे (RTD) पेय बनवून देश-विदेशात विक्री करतात. मासिया मध्ये गेली ५ वर्ष कार्यकारी सदस्य म्हणून काम करताना त्यांनी २०० पेक्षा जास्त सदस्य केले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना कोकण विभागाचे पहिले उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे.

**'महाराष्ट्र चेंबर' तर्फे प्रत्येक सभासदास आयकार्ड (ओळखपत्र) देण्यात येणार आहे, तसेच चेंबरचा मेंबरशिप डाटा अद्‌ययावत करण्यासाठी खाली दिलेला व्यक्तिगत माहितीचा फॉर्म भरून पोस्टाद्वारे पाठविण्याची विनंती आहे.**

## • सभासद व्यक्तिगत माहिती •

New Photo

संपुर्ण नांव : ........................................

जन्म तारीख : .................... विवाह तारीख : .................... ब्लड ग्रुप ....................

निवास पत्ता : ........................................

........................................

फोन नं (निवास) : .................... मोबाईल नंबर *: ....................

व्यवसाय नांव : ........................................

व्यवसाय पत्ता : ........................................

फोन नं.: .................... मोबाईल नंबर *: ....................

जी.एस.टी. नं.: ........................................

ई मेल *: ........................................

पत्रव्यवहार कोठे ? : निवास पत्ता ☐ व्यवसाय पत्ता ☐

सभासद नं.: ........................................

अन्य : ........................................

सही

**राज्याच्या व्यापार-उद्योग-सेवा क्षेत्राच्या विकासासाठी चेंबरच्या २२ एक्सपर्ट कमिटी (EC) कार्यरत आहेत. चेंबरच्या कामकाजात एक्सपर्ट कमिटींची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. या समित्यांच्या माध्यमातुन आपणही चेंबरच्या कार्यात सहभागी व्हावे अशी विनंती आहे. आपण आपल्या प्राधान्य क्रमानुसार कोणत्या समितीत काम करू इच्छिता ती माहीती पत्राद्वारे अथवा support@maccia.org.in या ई मेल वर पाठविण्याची विनंती आहे.**

- ☐ MSME (Admin) committee
- ☐ MSME (PR) committee
- ☐ Women Entrepreneur's committee
- ☐ PR, Media & Corp. commu. committee
- ☐ Tourism Committee
- ☐ Agriculture Food Processing committee
- ☐ International Relations committee
- ☐ Entrepreneur Development committee
- ☐ Environment committee
- ☐ Taxation committee
- ☐ HR & CSR committee
- ☐ Real Estate & Infrastructure Committee
- ☐ Energy Committee
- ☐ Ports Development & Logistics committee
- ☐ Education & Training Committee
- ☐ Finance, Banking & IT Committee
- ☐ Skill Council
- ☐ Young Entrepreneurs Wing
- ☐ Internal Trade Committee
- ☐ Civil Aviation Committee
- ☐ Centenary Committee
- ☐ Arbitration (ADR) Committee

**Note :**


- Expert Committee will be comprising Chairman, Co - Chairman, 6 members, (one each from every region)
- Managing Committee will decide the Chairman of the Committee
- Expert Committee members will decide the Co - Chairman
- With consensus, Committee is free to add max one member from each Region, who is locally active .
- Tenure : 2 years
- EC Members will be provided with official visiting cards from Chamber





KALIKA STEEL
मजबूत भारत की पहचान
KALIKA KAVACH
संपूर्ण सुरक्षा
KALIKA 500
कालिका स्टील - भरोसे का दूसरा नाम.
स्टील बनाता है भारत को मजबूत और भारत के हर निर्माण को मज़बूती प्रदान करते हैं. भारत को आत्मनिर्भर बनाने में कालिका स्टील अपना योगदान देनें के लिए सदैव तत्पर हैं.
KALIKA STEEL
www kalikasteels com

Date of Publish : 20th January 2022
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2019 License to post without prepayment. Posted on 20th January 2022 at Nashik
Head office Regd. No. NSK/RNP-82/2021-2023 Registered with Regr. of News Papers for India under Delhi Regd. No. 20803/71




हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापून २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to :
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M. G. Road, Nashik-1